POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१६५ ● मुंबई, शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## कुठे ईव्हीएम फोडले, तर कुठे उमेदवारांवर हल्ला

### राज्यातील मतदानाला गालबोट, तुमच्या शहरातील स्थिती काय?

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

राज्यात आज महानगरपालिका निवडणुकीसाठी अत्यंत चुरशीने मतदान प्रक्रिया पार पडत आहे. महापालिका निवडणुकीसाठी विविध शहरांमधून हिंसाचार, तोडफोड आणि राजकीय संघर्षाच्या गंभीर घटना समोर आल्या आहेत. आज सकाळपासूनच मतदानाचा उत्साह दिसून येत असला, तरी अनेक ठिकाणी सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आल्याने निवडणूक केंद्रांना जणू आखाड्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. सध्या पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या सर्व प्रकारांमुळे शांततेत पार पडणाऱ्या लोकशाहीच्या या मोठ्या उत्सवाला गालबोट लागले आहे. यामुळे मतदारांमध्ये काही काळ भीतीचे तर काही ठिकाणी संतापाचे वातावरण पाहायला मिळाले.




**धुळ्यात ईव्हीएमची तोडफोड, दोन तास मतदान ठप्प**

धुळे शहरातील प्रभाग क्रमांक १८ मधील मिरच्या मारुती प्राथमिक विद्या मंदिरात अत्यंत धक्कादायक प्रकार घडला. धुळ्यातील खोली क्रमांक १ मध्ये भाजप कार्यकर्त्यांनी शिवीगाळ करत मतदान यंत्राची तोडफोड केल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख सतीश महाले यांनी केला आहे. या घटनेमुळे मतदान प्रक्रिया तब्बल दीड ते दोन तास विलंबाने सुरू झाली. आमदार मंजुळा गावित यांनी या घटनेचा निषेध करत दोषींवर कारवाईची आणि मतदानाची वेळ वाढवून देण्याची मागणी केली आहे.

**छत्रपती संभाजीनगरमध्ये उमेदवारांची पोलिसांशी बाचाबाची**

छत्रपती संभाजीनगरमधील सिडको एन-३-४ परिसरातील संत मीरा मतदान केंद्रावर मोठा राडा झाला. भाजप उमेदवाराने पोलचीटवर पक्षाचे चिन्ह आणि कोडिंग असलेले टी-शर्ट वापरल्याचा आक्षेप शिवसेना आणि अपक्ष उमेदवारांनी घेतला. यावरून अपक्ष उमेदवार आणि पोलिसांमध्ये जोरदार शाब्दिक बाचाबाची झाली. परिस्थिती पाहता पोलीस आयुक्तांनी स्वतः घटनास्थळाची पाहणी केली.

**नाशिकमध्ये भाजप उमेदवाराच्या घरावर हल्ला**

नाशिकच्या प्रभाग क्रमांक २१ मध्ये तणाव निर्माण झाला आहे. भाजप उमेदवार नितीन खोले हे पैसे वाटप करत असल्याचा आरोप करत शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या घरावर हल्ला केला. यावेळी दोन्ही गटाचे पदाधिकारी आमनेसामने आल्याने नाशिकमध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

**नागपुरात उमेदवारावर मध्यरात्री हल्ला**

नागपूरमध्ये भाजप उमेदवार भूषण शिंगणे यांच्यावर मध्यरात्री अज्ञात व्यक्तींनी हल्ला केला. ज्यामध्ये ते जखमी झाले आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांची भेट घेऊन विचारपूस केली आहे. या हल्ल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट आहे. दहिसरमधील वॉर्ड क्रमांक १० मध्ये भगवा गार्ड आणि पोलिसांमध्ये झटापट झाली. बनावट मतदान रोखण्यासाठी गेल्याचे सांगणाऱ्या मनसेच्या ८ ते १० कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तसेच विरारमधील बहुजन विकास आघाडीच्या बुथवर भाजप कार्यकर्त्यांनी दमदाटी केल्याचा आरोप उमेदवार प्रशांत राऊत यांनी केला आहे.

**मतदारांना आमिष दाखवण्यावरून राडा**

चंद्रपूरच्या नेहरू शाळा मतदान केंद्रावर शिवसेना शिंदे गट (इसमत हुसेन) आणि भाजप बंडखोर (दीपा कासट) यांच्या समर्थकांमध्ये मतदारांना आमिष दाखवण्यावरून राडा झाला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यावर पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज करून जमाव पांगवला. तसेच मालेगावमधील केंद्र क्रमांक ९ वर बोगस मतदानाचा संशय आल्यानंतर उमेदवाराने आक्षेप घेताच संबंधित व्यक्तीने तेथून पळ काढला. आधार कार्डवर नाव नसतानाही मतदान होत असल्याचा गंभीर आरोप येथे करण्यात आला आहे.

**वेगवेगळ्या बूथवर जावं लागलं...**

मतदारांनी तक्रार केली की, "मतदान केंद्रांवर उपलब्ध असलेल्या मतदार यादीत आणि बीएमसीच्या ऑनलाइन डेटाबेसवर दाखवलेल्या मतदान केंद्र तपशीलांमध्ये मोठी विसंगती होती. त्यामुळे अनेकांना आपलं नाव शोधण्यासाठी दोन ते तीन वेगवेगळ्या बूथवर जावं लागलं." तथापि, मतदान अधिकाऱ्यांनी ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांना कोणताही त्रास होऊ नये याची विशेष काळजी घेतली.

**ठरलेल्या केंद्राच्या यादीत नाव नाहीच**

दहिसर (पूर्व) येथील रहिवासी जितेंद्र जैन यांनी सांगितले, "माझं नाव माज्या ठरलेल्या मतदान केंद्राच्या यादीत नव्हतंच. मी आणि माझा मुलगा चेतन, आम्हाला दोन वेगवेगळ्या केंद्रांवर जावं लागलं, तेव्हा कुठे नाव सापडलं."

## बोरीवली-दहिसरमध्ये मतदार यादीच्या विसंगतीमुळे नागरिक त्रस्त

### काहींचे बूथ बदलले तर काही मतदान न करताच परतले

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आज (दि. १५) सकाळी ७.३० वाजता मतदानाला सुरुवात झाली. मात्र, मुंबईतील अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या तपशीलांमध्ये विसंगती आढळून आल्याने सुरुवातीच्या टप्प्यात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. विशेषतः बीएमसीच्या आर सेंट्रल आणि आर नॉर्थ वॉर्डअंतर्गत येणाऱ्या बोरीवली व दहिसर परिसरातील मतदान केंद्रांवर सकाळी मतदान सुरू होताच काही काळ संभ्रमाचे वातावरण होते.

**मतदान न करताच निघून गेले**

सकाळी अनेक मतदान केंद्रांवर लांबलचक रांगा दिसल्या त्यात ऑफिसला जाणाऱ्या मतदारांची संख्या मोठी होती. मतदार केंद्रांवर स्वतःचं नाव शोधूनही मिळत नसल्याने अनेक मतदार मतदान न करता निघून गेले. खारमध्ये नोकरी करणारे बोरीवलीतील रहिवासी मनिषभाई हे सकाळी मी ७.३० वाजता मतदान केंद्रावर पोहोचले होते. ते म्हणाले, "माझं नाव यादीत नव्हतं. अजून किती केंद्रांवर जावं लागेल, ते माहित नव्हतं, माज्याकडे तेवढा वेळच नव्हता. म्हणून मी कामावर निघालो."

**तरुणांचा उत्साह कायम**

तथापि, मतदान यादीचा गोंधळ आणि लांबलचक रांगा असूनही पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या तरुण मतदारांचा उत्साह मतदानावेळी दिसून आला.






**शाई पुसली गेल्याने मतदारांमध्ये संताप निवडणूक आयोगाची पहिली प्रतिक्रिया!**

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांमध्ये, मुंबईसह मतदान प्रक्रिया सुरू आहे. या निवडणुकीत मतदानापूर्वी अनेक ठिकाणी पैशांचे वाटप झाल्याचे उघड झाले. विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाच्या कामकाजावर सुरुवातीपासूनच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दुहेरी मतदार आणि बनावट मतदार यांसारख्या समस्या समोर येत आहेत. आता यात एक नवीन गोष्ट जोडली गेली आहेः मतदानानंतर बोटावर अमिट शाईऐवजी मार्करने खुणा करणे. ही खुणा सहज पुसता येत असल्याचे धक्कादायक सत्य उजेडात आले आहे. यामुळे निवडणूक आयोग पुन्हा एकदा टीकेच्या केंद्रस्थानी आला आहे. यावर आता राज्य निवडणूक आयोगाने पहिली प्रतिक्रिया दिली आहे. आजच्या मतदानात बोटावर पारंपरिक शाईऐवजी मार्कर पेनचा वापर करण्यात आला. नखांवरची शाई पुसली जात असल्याचे आता मुंबई महापालिका आयुक्तांनी कबूल केले आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून मार्करचे किट उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले. भूषण गगराणी यांनी नखांवरील शाई पुसली जात असल्याचे मान्य केले. मतदान झाल्यानंतर बोटावरील शाई पुसता येत असल्याचे प्रकार उघड झाले आहेत. सोशल मीडियावर याचे अनेक व्हिडिओ व्हायरल होत आहेत. राज्य निवडणूक आयोगाने यावर स्पष्टीकरण दिले आहे. शाई पुसता येते का याची चौकशी सुरू असल्याचे त्यांनी म्हटले. मार्कर पेनचा वापर यापूर्वीच्या पालिका निवडणुकांमध्येही झाला असल्याचे सांगितले. मतदानानंतर बोटांवरील शाई पुसता येत असल्याचा प्रकार समोर आलाय. याचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरराज्य निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण आले आहे. शाई पुसली जाते का याबाबत चौकशी करत आहोत. मार्कर पेन या आधीच्या पालिका निवडणुकीत वापरला गेलाय. आहे. मार्करने बोटावर शाही गडद रंगात लावावी अश्या सूचना दिल्या असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे.

## निवडणूक आयोगाच्या वेबसाइटचे सर्व्हर डाऊन

### मतदार यादीत नाव शोधण्यासाठी गोंधळ, सोशल मीडियावर संताप

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आज (दि. १५) सकाळी ७.३० वाजता मतदानाला सुरुवात झाली आहे. जवळपास चार वर्षानंतर मुंबईला निवडून आलेले महापालिका प्रशासन मिळणार असल्याने या निवडणुकीला विशेष महत्त्व आहे. मतदानासाठी शहरातील विविध मतदानकेंद्रांबाहेर सकाळपासूनच रांगा लागल्या आहेत. तथापि, महत्त्वपूर्ण निवडणूक असूनही, मतदानाला सुरुवात होताच पहिल्या तासातच तांत्रिक त्रुटी आणि प्रशासनातील समन्वयाच्या अभावामुळे अनेक मतदारांना अडचणींचा सामना करावा लागल्याची माहिती समोर येत आहे.

**मतदार यादीत नाव असूनही "Service Unavailable"**

नावे नोंदवलेली असूनही, अनेक मतदारांनी दावा केला की महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या (एसईसी) वेबसाइटवर 'माहिती उपलब्ध नाही', सेवा उपलब्ध नाही, असे दाखवले जात आहे, ज्यामुळे मतदान केंद्रांबाहेर उभारलेल्या मदत केंद्रांवर त्यांना ताटकळत उभं राहावं लागत आहे.

**१०,००० पेक्षा जास्त मतदान केंद्रे; सुरक्षा कडक**

राज्य सरकारच्या अधिसूचनेनुसार, मतदानाला प्रोत्साहन देण्यासाठी आज सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याशिवाय, राज्य निवडणूक आयोगाने, मुंबईतील एकूण १.०३ कोटी पात्र मतदारांसाठी १०,००० पेक्षा जास्त मतदान केंद्रे, ६४,००० कर्मचारी आणि २८,००० पोलीस कर्मचारी तैनात केले आहेत. तसेच, महिलांसाठी पिंक बुथ्स, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी विशेष सुविधा ठेवण्यात आल्या आहेत.

**संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदानाची वेळ**

आज सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदारांना मतदान करता येणार आहे. मतदान संपल्यानंतर एश्ट मशीन सुरक्षित झोनल केंद्रांवर हलवण्यात येतील. तर मतमोजणी १६ जानेवारीला सकाळी १० वाजेपासून सुरू होईल आणि निकाल संध्याकाळपर्यंत जाहीर होण्याची शक्यता आहे.

**हेच का डिजिटल इंडिया?**

राज्य निवडणूक आयोगाची वेबसाइट बंद झाल्याने त्याचे पडसाद सोशल मीडियावर पाहायला मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते अनिश गावंडे यांनी 'एक्स्'वर लिहिले, "पूर्ण सर्कसः mahasecvoterlist.in ला आजच क्रॅश व्हायचं होतं? मतदार १९९५ सारखे धुळीने माखलेल्या कागदी यादीत नाव शोधत आहेत. हेच का डिजिटल इंडिया?" तात्काळ कारवाईची मागणी करत त्यांनी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगालाही टॅग केले.

**माझं नाव एका बुथवर तर...**

दुसऱ्या एका पोस्टमध्ये त्यांनी राज्यभरातील समस्या अधोरेखित केल्या आहेत. "महाराष्ट्रभरात, मतदारांना प्रत्यक्ष मतदार यादीतही त्यांची नावे सापडत नाहीयेत. मतदान केंद्रे विलीन केली आहेत. नावे दुसऱ्या ठिकाणी हलवली आहेत. माझे नाव एका मतदान केंद्रावर आहे, तर माज्या पालकांची नावे पूर्णतः वेगळ्या ठिकाणी असलेल्या दुसऱ्या मतदान केंद्रावर आहेत. ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे," असे त्यांनी लिहिले.

**अनेक मतदारांच्या तक्रारी**

इतर अनेक वापरकर्त्यांनीही अशाच प्रकारच्या तक्रारी केल्या. एसईसीची वेबसाइट डाऊन आहे, अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या तपशीलांमध्ये विसंगती आणि व्होटर स्लिप्सचा अभाव यामुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे. मतदान न करताच घरी परतावे लागत आहे. काहींना तर छापील मतदार यादीत स्वतःच नाव शोधावे लागले, ज्यामुळे विलंब आणि गोंधळ वाढला.

## कोकणत 'दिल्ली लॉबी' विरोधात संपूर्ण गाव पेटून उठलं

### 'परप्रांतियांना जमिनी विकणार नाही' म्हणत ग्रामदेवतेसमोर कोकणातील गावाने घेतली शपथ

■**मुंबई। प्रतिनिधी,**

कोकणतलं एक गाव दिल्ली लॉबीच्या विरोधात एकत्र आलं आहे. कोकणातला अनेक भाग हा इकोसेन्सिटिव्ह झोनमध्ये येतो. या भागांमध्ये आता अतिक्रमण होताना दिसत आहे. त्यामुळे गावकऱ्यांनी चक्क आपल्या ग्रामदेवतेसमोर नारळ देऊन शपथ घेतली आहे.

पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील अशा इकोसेन्सिटिव्ह झोनमध्ये असलेल्या कोलझर गावामध्ये परप्रांतीय लोकांचा वावर वाढला आहे. ग्रामस्थांना आलेल्या या संशयामुळे त्यांनी आपल्या जमिनी आणि निसगार्बाबत एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आपल्या गावचं आणि जमिनी, निसगार्चं रक्षण करण्यासाठी कोलझरमधील ग्रामस्थ एकवटले असून त्यांनी ग्रामदेवतेला नारळ देत शपथ घेतली आहे.



गेल्या काही दिवसांपासून गावांत अनधिकृत उत्खनन सुरु असल्याचं समोर आलं आहे. तसेच जमिनींचे व्यवहार देखील घडल्याचा त्यांचा संशय आहे. याबाबत अद्याप अधिकृतपणे माहिती समोर आलेली नाही पण भविष्यात गावातील जमिनी परप्रांतीयांच्या हातात जाऊ नये म्हणून ग्रामस्थ सावध आहेत. त्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला आहे.

वनशक्ती या संस्थेने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेवरील निर्णयामुळे केंद्राने अधिसूचना काढून कोलझर गाव इकोसेन्सिटिव्ह झोन म्हणून जाहीर केले. याशिवाय येथे २०१८ पपासून वृक्षतोड बंदी आदेश देखील लागू केले आहेत. असे असूनही गेल्या आठवड्यात खिश्चनवाडीपासून घनदाट जंगलापर्यंत अवैधत्यरित्या खनिजयुक्त मातीचे उत्खनन देखील करण्यात आले.

यामुळे गावकऱ्यांनी ग्रामदेवतेला नारळ देत शपथ घेतली ही परप्रांतियांना जमिनी विकल्या जाणार नाहीत. कारण गावात अवैध होत असलेल्या उत्खननामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. तसेच येथील जैवविविधतेला धोका पोहोचत आहे. या जंगलात पट्टेरी वाघासह अन्नसाखळीतील अनेक दुर्मिळ प्राणी, पक्षी आणि इतर घटक यांचा अधिवास आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोलझर गावातील लोकांनी ही शपथ घेतली आहे.

## हकालपट्टीनंतरही बांगलादेशी महिलांचा पुन्हा बेकायदेशीर मुंबईत प्रवेश

**महिलांकडे भारतीय बनावट कागदपत्र**

तपासादरम्यान दोन्ही महिलांच्या मोबाईल फोनमध्ये बांगलादेशी ओळखपत्रांच्या प्रती आढळून आल्या. याशिवाय, भारतात वास्तव्यासाठी त्यांनी बनावट भारतीय कागदपत्रे तयार केल्याचेही समोर आले. पोलिसांनी दोघींनाही भायखळा येथील महिला कारागृहात पाठवले आहे. बेकायदेशीर प्रवेश आणि परदेशी नागरिक कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना पुन्हा बांगलादेशला पाठवले जाणार आहे.




■**मुंबई। प्रतिनिधी,**

हद्दपार केल्यानंतर पुन्हा बेकायदेशीर प्रवेश करून मुंबईत परतण्याच्या घटनांनी सुरक्षा यंत्रणांसमोर गंभीर प्रश्न उभे केले आहेत. ऑगस्ट २०२५ मध्ये बांगलादेशला पाठवलेल्या दोन बांगलादेशी महिलांनी काही कालावधीतच बेकायदेशीर सीमा ओलांडून भारतात प्रवेश करून मुंबई गाठल्याचे उघड झाले आहे. सोमवारी कफ परेड आणि गेटवे ऑफ इंडिया परिसरातून पोलिसांनी या दोघींना पुन्हा ताब्यात घेतले.

**बेकायदेशीर सीमा ओलांडून पुन्हा मुंबईत प्रवेश**

पोलीस तपासानुसार, पश्चिम बंगाल सीमेवरून हद्दपार झाल्यानंतर या महिला उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील घोजाडांगा परिसरातील जंगलमय, बेकायदेशीर मागार्चा वापर करून पुन्हा भारतात शिरल्या. त्यानंतर रेल्वे व इतर साधनांनी त्या मुंबईत दाखल झाल्या. अटक करण्यात आलेल्या महिलांची ओळख झुलेखा जमाल शेख आणि बिल्किस बेगम सिरामिया अख्तर झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, झुलेखा शेखला ऑगस्ट २०२५ मध्ये आग्रीपाडा पोलिसांनी पकडले होते. इमिग्रेशन यंत्रणांच्या मदतीने तिला पश्चिम बंगाल सीमेवरून बांगलादेशला पाठवण्यात आले होते. त्याचप्रमाणे, बिल्किस अख्तरला गुन्हे शाखेच्या युनिटकडून अटक करून बांगलादेशात हद्दपार करण्यात आले होते. मात्र, हद्दपारीनंतर अल्पावधीतच दोघींनी पुन्हा अवैधरीत्या भारतात प्रवेश केला.

**घुसखोरी पोलिसांसमोर आव्हान**

पोलिसांचे म्हणणे आहे की पहिल्यांदा पकडल्यावर अनेक घुसखोरांना सीमेवरून परत पाठवले जाते, मात्र मोठ्या संख्येने व्यक्ती पुन्हा अवैध मार्गाचा वापर करून भारतात येतात. मुंबईसारख्या महानगरांत मजुरी आणि छोट्या कामांमुळे अशा व्यक्तींची ओळख पटवणे आणि सतत देखरेख ठेवणे हे आव्हान ठरत आहे.

याआधीही अशीच घटना समोर आली होती. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये हद्दपार करण्यात आलेली बांगलादेशी महिला काही दिवसांतच महाराष्ट्रात परतली होती आणि पुण्यात स्थायिक झाली होती. तिच्याकडे वेगवेगळ्या नावांनी दोन आधार कार्ड आढळून आल्याने खळबळ उडाली होती. अशा घटनांमुळे हद्दपारीनंतरही पुन्हा प्रवेश रोखण्याबाबतच्या यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

## कोल्हापुरात काळी बाहुली, लिंबू अन् टाचण्या

### ठाकरेंच्या शिलेदारावर भानामतीचा प्रकार... मतदानाच्या तोंडावर खळबळ

■**कोल्हापूर। प्रतिनिधी,**

राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाची तयारी पूर्ण होऊन सर्वांचे लक्ष मतदानाकडे लागले आहे. त्यातच कोल्हापूर जिल्ह्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा प्रमुख रविकिरण इंगवले यांच्यावर राधानगरी तालुक्यातील दुर्गमानवाड येथे भानामती केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाच्या ठीक आदल्या दिवशी हा प्रकार समोर आल्याने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात तीव्र खळबळ उडाली आहे.

गेल्या तीन-चार वर्षांपासून रविकिरण इंगवले शहरातील विविध स्थानिक समस्या, सामाजिक प्रश्न आणि विकासाच्या मुद्द्यांवरून आंदोलने करत आहेत. महापालिका निवडणुकांच्या प्रचारावेळी महायुतीच्या नेत्यांवर गुन्हेगारी पार्श्वभूमी, भ्रष्टाचार आणि नातेवाईकांना उमेदवारी देण्याचे गंभीर आरोप त्यांनी केले. बलभीम बँक घोटाळा, आमदार पुत्राची उमेदवारी यासह विविध मुद्द्यांवरुन त्यांनी प्रचारसभांमधून जोरदार हल्ला चढवला होता.



या काळात इंगवले यांनी कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रभागांतील रस्ते, पाणीपुरवठा आणि ड्रेनेजसारख्या समस्या उपस्थित करून नागरिकांमध्ये पक्षाची पकड मजबूत केली. पक्षाच्या वचननामा प्रकाशन सोहळ्यातही त्यांनी उपस्थिती लावून विकासाभिमुख भूमिका मांडली. महायुतीच्या उमेदवारांविरुद्ध त्यांचे आरोप निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिक तीव्र झाले होते.

**महिलांकडे भारतीय बनावट कागदपत्र**

दुर्गमानवाड येथे भानामतीचा प्रकार

सोमवारी मध्यरात्री राधानगरी तालुक्यातील दुर्गमानवाड देवस्थान मंदिराजवळील झाडावर इंगवले यांचा फोटो खिळे ठोकून भानामती करण्यात आली होती. काळी बाहुली, लिंबू, टाचण्या यांसारखे साहित्य वापरल्याची माहिती समोर आली असून, हा प्रकार आज सकाळी ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांना आढळला. त्यांनी तात्काळ इंगवले यांना कळवले. मतदानाच्या एका दिवस आधी असा प्रकार घडल्याने दुर्गमानवाड आणि परिसरात भीतीचे वातावरण पसरले. स्थानिक कार्यकर्ते व नागरिकांनी घटनास्थळी जमा होऊन निषेध व्यक्त केला. कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट आघाडीने वचननामा जारी करून विकासाच्या मुद्द्यांवर भर दिला आहे. इंगवले यांच्या आक्रमकतेमुळे महायुतीमध्ये अस्वस्थता असल्याचे राजकीय निरीक्षक सांगतात. त्यातच हा प्रकार निवडणुकीच्या वातावरणात तणाव वाढवणारा ठरला आहे. दरम्यान परिसरातील ग्रामस्थांनी अंधश्रद्धेच्या विरोधात आवाज उठवला असून, पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे. राजकीय वतुर्ळात याचे परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## तस्करीमध्ये क्रिप्टोकरन्सीचा वापर वाढला

### राजस्व गुप्तचर संचालनालयाचा अहवाल

■**मुंबई। प्रतिनिधी,**

राजस्व गुप्तचर संचालनालय (डीआरआय) यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात सोने, अमली पदार्थांच्या तस्करीसाठी क्रिप्टोकरन्सीचा वापर अलीकडच्या वर्षांत लक्षणीयरीत्या वाढल्याचे नमूद केले आहे. यूएसडीटीसारखी स्टेबलकॉइन्स पारंपरिक हवाला नेटवर्कची जागा घेत असल्याचेही अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

या डिजिटल मालमत्तांमुळे जलद व गुप्त आर्थिक व्यवहार शक्य होत असून त्यावर मर्यादित देखरेख आहे आणि मनी लॉन्डरिंगविरोधी नियमांचे पालन कमकुवत असल्याचे डीआरआयने नमूद केले आहे.

डीआरआयनुसार, अनेकदा अज्ञात असलेली आणि व्हीपीएनद्वारे सहज वापरता येणारी क्रिप्टो वॉलेट्स 'ऑफ-द-बुक' बेकायदेशीर पेमेंटसाठी वापरली जात आहेत. यात कमी किंमत दाखवलेली (अंडर-इनव्हॉइस्ड) किंवा



चुकीची माहिती दिलेली आयात समाविष्ट असून त्यामुळे तस्कर सीमाशुल्क शुल्क, कर आणि इतर नियामक अटी चुकवतात.

बिटकॉइनसारख्या क्रिप्टोकरन्सींच्या अर्ध-अज्ञात स्वरूपामुळे फसवणूक करणाऱ्यांना आपली ओळख लपवता येते. ज्यामुळे तपास व अंमलबजावणी कठीण होते. सोन्याची आणि अंमली पदार्थांची तस्करी करताना विक्रीतून मिळालेली रक्कम हवाला मार्गे किंवा क्रिप्टोकरन्सीतून परदेशातील सूत्रधारांकडे पाठवली जाते.

**इंडो-चीन सीमेवरून तस्करी**

जुलै २०२४ मध्ये डीआरआयने आंतरराष्ट्रीय सोन्याच्या तस्करीचे जाळे उघडकीला आणले होते. या प्रकरणात १०८ किलो परदेशी सोन्याची तस्करी इंडो-चीन सीमेवरून खेचर आणि हमालांच्या माध्यमातून करण्यात आली होती. हे सोने दिल्लीला पोहोचल्यानंतर सराफ व परकीय चलन व्यवहार करणाऱ्यांमार्फत विकण्यात आले.

**तपास अधिक गुंतागुंतीचा**

पारंपरिक तस्करी नेटवर्क आणि नव्या डिजिटल आर्थिक प्रणाली यांच्यातील एकत्रीकरण वाढत आहे. विकेंद्रित आणि अर्ध-अज्ञात स्वरूपामुळे क्रिप्टोकरन्सी तस्करांना निधी हस्तांतरण आणि बेकायदेशीर नफ्याचे लपवणे सोपे करून देते. त्यामुळे तपास आणि अंमलबजावणी अधिक गुंतागुंतीची होत आहे.

**प्रगत फॉरेन्सिक साधनांची गरज**

क्रिप्टोकरन्सी व्यवहारांचा माग काढण्यासाठी डीआरआयने ब्लॉकचेन ॲनालिटिक्सचा केलेला वापर हा क्रिप्टो गुन्ह्यांविरुद्ध लढ्यात महत्त्वाचा टप्पा आहे. डिजिटल मालमत्तांचे बदलते स्वरूप लक्षात घेता प्रगत फॉरेन्सिक साधनांची गरज आहे.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## यांच्या मोफत उपचारावर संकट



**खासगी रुग्णालयांच्या महागड्या उपचारांपासून दिलासा देणारी मुंबई महापालिकेची रुग्णालये आता पीपीपी निर्णयामुळे सर्वसामान्यांसाठी महाग होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

मुंबईतील महापालिका, राज्य सरकारची रुग्णालये देशभरातील रुग्णांसाठी अविरत सेवा देत आहेत. आधुनिक उपकरणे, तज्ज्ञ डॉक्टर, नर्स ते वॉर्डबॉय यांच्या निःस्वार्थ सेवेने मुंबईतील रुग्णालयांची कीर्ती देशभरात पोहचली आहे. दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी देशाच्या कानाकोपऱ्यातील रुग्ण मुंबईतील रुग्णालयात येतात. मुंबई आणि राज्यातील रुग्णांसोबतच विविध राज्यातून येणारे रुग्ण महापालिका आणि राज्य सरकारच्या रुग्णालयात येत असल्याने येथे प्रचंड गर्दी होऊ लागली आहे. बाह्यरुग्ण विभागात तर उभे राहण्यासाठी जागा शिल्लक नसल्याचे चित्र प्रमुख रुग्णालयांमध्ये आजही नजरेस पडते. रुग्णालयातील खाटेवर तर दोन-दोन रुग्ण असतात. तितकेच जमिनीवर देखील. मात्र ही स्थिती वर्षानुवर्षे बदलू शकलेली नाही. रुग्णांची संख्या कित्येक पटीने वाढत असताना मात्र रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची कित्येक पदे रिक्त आहेत. त्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येऊ लागला आहे. मुंबईत खासगी रुग्णालयांचे पेव फुटले आहे. या रुग्णालयात उपचारासाठी लाखो रुपयांचा खर्च येतो. रुग्णालयांकडून रुग्णांची लूट सुरू असतानाही यावर आजही कोणीही नियंत्रण आणू शकलेले नाही. त्यामुळेच खासगी रुग्णालये सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेली आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना उपचारासाठी महापालिका, सरकारी रुग्णालयात जाण्यावाचून पर्याय नसतो. परंतु या रुग्णालयातील परिस्थिती पाहून लोकांचा थरकाप उडतो. हतबल झालेले गोरगरीब लोक उपचारासाठी याच रुग्णालयात दाखल होतात. या रुग्णालयांची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत आहे. मात्र यासाठी प्रशासनाने थेट स्वतःची जबाबदारी दुसऱ्यावर ढकलण्यासाठी पावले उचलली असल्याचे दिसत आहे. मुंबई महानगरपालिकेची पाच मोठी आणि लहान अशी अनेक रुग्णालये आहेत. यापैकी प्रमुख रुग्णालयांचा सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर विकास करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे पालिका रुग्णालयांमध्ये आजवर मिळणारी मोफत रुग्णसेवा सशुल्क होईल. रक्त तपासणी, क्ष-किरण, सीटी स्कॅन, एमआरआय यासाठी रुग्णांकडून भरमसाट शुल्क आकारले जाऊ शकते, तर आंतररुग्ण विभागातील रुग्णांना देण्यात येणारे जेवण, खाट, डॉक्टरांची सेवा, औषधे आणि मलमपट्टीसाठीही शुल्क आकारण्यात येईल. याचा सर्वाधिक फटका गोरगरीबांना बसणार आहे. त्यामुळे नागरिक आणि कर्मचारी संघटना या निर्णयाविरोधात एकवटल्या आहेत. मुंबई आणि पुण्यामध्ये पीपीपी मॉडेल राबविण्यात आले. काही आऊटसोर्स केलेल्या आयसीयूमध्ये चक्क होमिओपॅथी डॉक्टरांकडून आयसीयू सेवा चालविण्यात येत असल्याचे समोर आले. त्यामुळे अनेकांना जीव गमवावा लागला आहे. मुंबई महानगरपालिकेने यापूर्वीही २० हून अधिक प्रकल्प पीपीपीमार्फत सुरू केले. यामध्ये अतिदक्षता विभाग (आयसीयू), निदान केंद्र, रक्त शुद्धीकरण केंद्र (डायलिसिस युनिट्स) आणि प्रसूतिगृहे यांचा समावेश आहे. पीपीपीमुळे या प्रकल्पांच्या सेवेची गुणवत्ता किंवा उत्तरदायित्व वाढले, असा कोणताही पुरावा नाही. याउलट अनेक पीपीपी प्रकल्प समस्याग्रस्त ठरल्याने ते बंद करण्याची वेळ महानगरपालिकेवर आली आहे. असे असतानाही पुन्हा पीपीपी धोरणाचा प्रशासनाचा अट्टाहास आहे. मुंबईतील सुमारे ४० टक्के लोक झोपडपट्टीमध्ये वास्तव्य करत आहेत. तसेच संक्रमण शिबिरे, प्रकल्पबाधितांच्या वसाहतींमध्ये लाखो लोक राहत आहेत. यामधील बहुतांश लोक उपचारासाठी महानगरपालिका रुग्णालयातच जातात. हातावर पोट असलेले लोक मोफत उपचारासाठी या रुग्णालयांवर अवलंबून आहेत. येथील रुग्णालये सशुल्क झाल्यास गोरगरीबांना उपचाराविना तडफडत मरण्याची वेळ येऊ शकते. यामुळेच मानखुर्द गोवंडी परिसरातील नागरिकांनी रुग्णालयांच्या खासगीकरणाविरोधात दंड थोपटले आहेत. अशीच मोहीम मुंबईतील इतर भागात सुरू होऊ लागली आहे. जनभावना विचारात घेऊन पालिका प्रशासनाने अस्तित्वातील व्यवस्था सुधारण्यावर भर देणे गरजेचे आहे.मुंबई महानगरपालिका ही सर्व त्रिस्तरीय आरोग्य सेवा पुरविणारी देशातील एकमेव महानगरपालिका आहे. यामध्ये २१२ आरोग्य केंद्रांमार्फत प्राथमिक प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, १९२ दवाखाने, २५० हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, ३० प्रसूतिगृहे, ५ विशेष रुग्णालयांमार्फत प्राथमिक उपचारात्मक आरोग्य सेवा तसेच १६ उपनगरीय रुग्णालयांमार्फत द्वितीय स्तरावरील वैद्यकीय उपचार आणि ४ वैद्यकीय आणि १ दंत महाविद्यालयासह ५ प्रमुख रुग्णालयांमार्फत तृतीय स्तरावरील वैद्यकीय उपचार यासारख्या सर्वसमावेशक सेवा पुरविण्यात येतात. प्रमुख रुग्णालयांमध्ये प्रतिवर्षी सरासरी ६५ लाखांहून अधिक रुग्ण दाखल होतात. त्याचप्रमाणे उपनगरीय रुग्णालयांमध्ये प्रतिवर्षी ४५ लाखांहून अधिक रुग्ण उपचारासाठी येतात. एवढ्या मोठ्या संख्येने रुग्ण महापालिका रुग्णालयात उपचारासाठी दाखल होत आहेत. यानंतरही प्रशासन रिक्त पदे भरून नागरिकांना मोफत उपचार देण्याच्या आपल्या जबाबदारीतून मुक्त होऊ पाहत असल्याचे दिसत आहे. महापालिका रुग्णालयांचे खासगीकरण झाल्यास यावर प्रशासनाचे नियंत्रण राहणार नाहीच. मात्र यामध्ये अधिकारी मात्र आपली झोळी भरून घेणार. यासाठीच रुग्णालयांच्या खासगीकरणाला बळकटी देण्याचा घाट घालण्यात येत आहे. गोरगरीब जनतेच्या आरोग्याचा विचार करून प्रशासनाने तज्ज्ञांची समिती नेमून आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी ठोस धोरण तयार करायला हवे. या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करून गोरगरीब जनतेला दिलासा द्यावा. अन्यथा गोरगरीब जनतेचा जीव धोक्यात येईल.

# प्रतिबंधात्मक कारवाई करताना अधिकारांचे उल्लंघन नको



प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून जेव्हा कोणत्याही व्यक्तीला ताब्यात घेतले जाते, त्यावेळी त्याच्या मूलभूत अधिकारांवर गदा येत असते. प्रतिबंधात्मक कारवाई केल्यानंतर न्यायालयांनी अशा प्रकरणांकडे खूप गांभीर्याने बघितले पाहिजे. ज्या यंत्रणा प्रतिबंधात्मक कारवाई करीत आहेत, त्या कायद्याने त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचे उल्लंघन तर करीत नाही ना, याकडे सर्वात आधी न्यायालयांनी लक्ष दिले पाहिजे, असे न्या. यशवंत चंद्रचूड यांनी एका निकालामध्ये म्हटले होते.

मुळात कोणत्याही समाजात कायद्याची गरज काय, या प्रश्नाचे उत्तर जेव्हा शोधायला लागतो, त्यावेळी आपल्याला भूतकाळात जावे लागते. समाजामध्ये किंवा देशांमध्ये कायदा का अस्तित्त्वात आला असावा, याचे जे विविध सिद्धांत मांडण्यात आले आहेत, त्यामध्ये प्रत्येक व्यक्तीची सुरक्षितता हा घटकसुद्धा महत्त्वाचा धरण्यात आला. समाजामध्ये राहणारे सगळेच एकसारखे नसतात. बळी तो कान पिळी किंवा मोठा मासा लहान माशाला खातो, असे होऊ नये म्हणूनच कायद्याची गरज आहे. कायद्याचे राज्य या संकल्पनेमध्ये सर्वात महत्त्वाचा आहे कायदा. थोर विचारवंत प्रा. डायसी यांनी जी कायद्याच्या राज्याची संकल्पना मांडली, त्यामध्ये कायदा सर्वश्रेष्ठ असला पाहिजे, असे म्हटले आहे. त्याचबरोबर कायद्यापुढे सगळे समान असले पाहिजेत, असेसुद्धा त्यांनी सांगितले होते. आपल्या घटनाकारांनी ही दोन्ही तत्त्वे संपूर्णतः स्वीकारली आहेत. आपल्या देशात राज्यघटना सर्वश्रेष्ठ आहे आणि त्याच राज्यघटनेतील अनुच्छेद १४ मध्ये कायद्यापुढे सगळे समान असल्याचा उल्लेखही आहे.

जेव्हा कायदा अस्तित्त्वात येतो, त्यावेळी प्रत्येक घटनात्मक संस्थेची कार्यकक्षा, अधिकार निश्चित होतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कायदा करण्यात आला असला, तरी त्याचा अर्थ लावून कोणत्याही खटल्यात निकाल देण्याचे काम न्यायालयांनाच करावे लागते. प्रत्येक खटल्यातील तथ्यांनुसार हा निकाल वेगवेगळा असतो. तरीही तिथे कायदा, त्यातील तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाने आधी दिलेले निकाल, वकिलांनी केलेले युक्तिवाद, पुरावे या सगळ्यांचा विचार केला जातो. जेव्हा विषय गुन्हेगारीविषयक कायद्यांचा असतो, तिथे एक पक्षकार हे नेहमीच राज्य सरकार असते. समाजातील प्रत्येक व्यक्तीचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही सरकारवर आहे. त्यासाठीच पोलीस, न्यायालये आणि इतर तपास यंत्रणा कार्यरत असतात. कायदा आणि सुव्यवस्था हा शब्द आपल्या सगळ्यांच्या परिचयाचा आहे.

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून काहीवेळा काही जणांना प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ताब्यात घेतले जाते. आता कोणालाही प्रतिबंधात्मक कारवाईसाठी ताब्यात घेताना पोलिसांना एक ठराविक कार्यपद्धती पाळावी लागते. तसेच प्रतिबंधात्मक कारवाईचा कालावधीही निश्चित असतो. या संदर्भात राज्यघटनेतील अनुच्छेद २२ मध्ये सविस्तर तरतुदी सापडतात. मुंबई उच्च न्यायालयापुढे असलेल्या एका खटल्यामध्ये कायदा व सुव्यवस्था आणि सार्वजनिक सुव्यवस्था या दोन्ही संकल्पनांचा जुन्या खटल्यांचा दाखला देऊन सुटसुटीतपणे विचार करण्यात आला. सामान्य नागरिक म्हणून आपण त्याकडे गांभीर्याने बघितले पाहिजे आणि यातील फरक समजून घेतला पाहिजे.

राम मनोहर लोहिया विरुद्ध बिहार सरकार या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयातील न्या. हिदायतुल्ला यांनी यावर भाष्य केले होते. समाजात जेव्हा कोणताही गुन्हा घडतो, त्यावेळी सर्वात आधी कायदा आणि सुव्यवस्था बाधित होते. उदा. मद्यप्राशन केलेल्या दोन व्यक्तींमध्ये रस्त्यावर भांडण सुरू झाले असेल, तर त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. सार्वजनिक सुव्यवस्थेशी याचा लगेच संबंध येत नाही. एखाद्या भागामध्ये दोन समाजांमध्ये तेढ निर्माण झाले आणि त्यातून एका समाजातील व्यक्ती दुसऱ्या समाजातील व्यक्तींवर धावून गेली तर अशावेळीही सर्वात आधी कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. पण दोन समाजातील तेढीमधून जर मोठी दंगल उसळली आणि बराच मोठा भाग त्यामुळे अडचणीत सापडला, तर त्यातून सार्वजनिक सुव्यवस्था बाधित होऊ शकते. मग अशावेळी सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याच्या उद्देशाने पोलीस काहीजणांना प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ताब्यात घेऊ शकतात.

कायदा आणि सुव्यवस्था हे खूप मोठे वर्तुळ आहे. ज्यामध्ये बऱ्याच गोष्टींचा समावेश होऊ शकतो, पण सार्वजनिक सुव्यवस्था हे त्यातीलच एक छोटे वर्तुळ आहे. अत्यंत निवडक गुन्हेच या वतुर्ळामध्ये घेता येतील. सार्वजनिक सुव्यवस्थेचा विचार करताना गुन्हेगाराचे कृत्य हे समाजातील अनेक लोकांमध्ये भीती निर्माण करणारे, त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करणारे असले पाहिजे. जेव्हा मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये अशी भीती निर्माण होईल, त्यावेळी सार्वजनिक सुव्यवस्था धोक्यात आल्याचे म्हणता येईल. उद्या जर बंद खोलीत अ या व्यक्तीने ब या व्यक्तीचा खून केला, तर त्यातून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नक्कीच निर्माण होतो. पण हा सार्वजनिक सुव्यवस्थेचा विषय नक्कीच नाही. तो गुन्हा आहे. पण केवळ त्या एका गुन्ह्यामुळे समाजातील मोठा वर्ग भयभीत झाला आहे, त्याच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, असे लगेच म्हणता येणार नाही, असे त्यांनी म्हटले होते.

आता विषय येतो की जर समाजातील एखाद्या गुन्हेगारी कृत्यामुळे लोकांनी सावधपणे तेथून निघून जाण्याचा किंवा स्वतःच्या सुरक्षेसाठी कृती करण्याचा निर्णय घेतला तर त्याचा अर्थ ते भयभीत झाले आहेत, असा लावायचा का?, या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने थेटपणे असा अर्थ लावता येणार नसल्याचे म्हटले आहे. ती लोकांची स्वाभाविक कृती आहे. अशा परिस्थितीमध्ये कोणताही व्यक्ती अशाच पद्धतीने वागेल. पण यामुळे लगेचच सार्वजनिक सुव्यवस्था धोक्यात आली, असे म्हणता येणार नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. न्या. यशवंत चंद्रचूड यांनी कुसो साह विरुद्ध बिहार सरकार या खटल्याच्या निकालावेळी म्हटले होते की चोरी, हाणामारी यासारखे गुन्हे हे असंघटित स्वरुपाचे आहेत. यामुळे सार्वजनिक सुव्यवस्था धोक्यात येत नाही. जेव्हा समाजात कोणताही गुन्हा घडतो, त्यावेळी काही प्रमाणात अव्यवस्था निर्माण होते. पण प्रत्येकवेळी अशी अव्यवस्था ही सार्वजनिक सुव्यवस्था बाधित करते, असे म्हणता येणार नाही.

प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून जेव्हा कोणत्याही व्यक्तीला ताब्यात घेतले जाते, त्यावेळी त्याच्या मूलभूत अधिकारांवर गदा येत असते. प्रतिबंधात्मक कारवाई केल्यानंतर न्यायालयांनी अशा प्रकरणांकडे खूप गांभीर्याने बघितले पाहिजे. ज्या यंत्रणा प्रतिबंधात्मक कारवाई करीत आहेत, त्या कायद्याने त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचे उल्लंघन तर करीत नाही ना, याकडे सर्वात आधी न्यायालयांनी लक्ष दिले पाहिजे, असे न्या. चंद्रचूड यांनी त्या निकालामध्ये म्हटले होते. अनेकवेळा आपण बोलताना काही शब्द वापरत असतो. पण त्याचा नेमका अर्थ काय आहे, हे अनेकांना माहिती नसते. काही शब्द प्रचलित झाले म्हणून चुकीच्या पद्धतीनेही वापरले जातात. न्यायालयांना कोणत्याही खटल्यामध्ये निकाल देताना असे करून चालत नाही. त्यांना प्रत्येक मुद्द्याचा सखोल विचार करावा लागतो. कायद्यातील विविध संकल्पना काय आहेत, त्याचा अर्थ कसा लावला पाहिजे, याचा त्यांना विचार करावा लागतो. कायद्यातील तरतुदींचा शब्दशः अर्थ लावायचा की अर्थ लावताना काही स्वातंत्र्य घ्यायचे हेसुद्धा न्यायालये ठरवत असतात.

आपल्यासमोर आलेल्या खटल्यामध्ये पोलिसांनी किंवा सरकारी पक्षाने दाखविलेली बाजू जर कायद्यातील चौकटींच्या बाहेर जाणारी असेल, तर न्यायालये प्रश्न उपस्थित करू शकतात. त्याची उत्तरे सरकारी पक्षाला द्यावी लागतात. जर ही उत्तरे समाधानकारक नसतील, तर न्यायालये संबंधित आरोपीला कारागृहातून सोडण्याचे आदेशही देऊ शकतात. या लेखाच्या सुरुवातीला आपण ज्या कायद्याच्या राज्याबद्दल बोलत होतो. न्यायालये या कायद्याच्या राज्याचे रक्षण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असतात. उगाचच एखाद्याला पोलिसांनी डांबून ठेवले तर न्यायालयांचा दरवाजा ठोठावून त्याच्या सुटकेसाठी प्रयत्न करता येतात. वरवर यामध्ये काय विशेष असे आपल्याला वाटू शकते. पण ज्याच्यावर अशी वेळ येते, त्यालाच स्वातंत्र्य म्हणजे नक्की काय हे समजू शकते. म्हणूनच न्यायालयांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.



# बळी पडण्याची चूक कुणाची!

आम्ही हिंदुत्वाच्या रक्षणासाठी एकत्र आलो आहोत, आमची युती ही तत्वासाठी आहे, स्वाथार्साठी नाही, असे म्हणत १९८० साली शिवसेना आणि भाजपने महाराष्ट्रात युती केली होती, पण आज त्या दोन्ही पक्षांमधील संबंध कसे आहेत, त्याचे चित्र सगळ्यांसमोर आहे. २०२२ साली मूळ शिवसेना फुटली. ती एकनाथ शिंदे यांच्या ताब्यात गेली. अर्थात, अजूनही त्याविषयीचा अंतिम निर्णय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. भाजपने आम्हाला फसवले, असा आरोप उद्धव ठाकरे करतात, तर उद्धव ठाकरे यांनी दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी बांधिलकी ठेवली नाही, त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसशी सत्तेसाठी हातमिळवणी केली, असा आरोप भाजप करते.

अर्थात, त्याच राष्ट्रवादीच्या अजित पवारांना भाजपने स्वतःसोबत घेतले. २००६ साली विभक्त झालेले उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे आता एकत्र आले आहेत. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक ते त्यांच्या पक्षांच्या युतीने लढवणार आहेत. बुधवारी एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना उद्धव ठाकरे यांनी भाजपवर तोंडसुख घेतले. भाजप दगाफटका करणारा पक्ष आहे, त्यांच्याबरोबर पुन्हा जाण्याचा प्रश्नच नाही. भाजपने २०१४ ला शिवसेनेसोबतची युती तोडली. २०१९ ला आम्हाला दगा दिला. तसेच शिवसेना दोन नाहीत, आमची शिवसेनाच शिवसेना आहे. दुसरी आहे ती शहा सेना आहे. शिवसेना म्हणजे स्वाभिमानी आणि अभिमानी संघटना आहे, असा त्यांनी दावा केला.

जेव्हा २०१४ साली शिवसेना आणि भाजप यांची युती तुटली, त्यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले होते की, शिवसेना २५ वर्षे युतीमध्ये सडली. त्यांचे हे विधान अतिशय धक्कादायक आणि आश्चर्यकारक होते. कारण तोपर्यंत २५ वर्षे या दोन्ही पक्षांनी राज्य पातळीवर आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर युती करून सत्ता उपभोगली होती. शिवसेना स्वबळावर सत्ता मिळवण्यात कमी पडत होती, म्हणूनच त्यांना भाजपची मदत घ्यावी लागत होती. अगदी १९९५ साली भाजपशी युती करून त्यांना महाराष्ट्राची सत्ता मिळाली होती आणि शिवसेनेचा मुख्यमंत्री झाला होता. तसेच मुंबईसारख्या महत्त्वाच्या पालिकेमध्ये शिवसेनेला भाजपचे सहाय्य होते. त्यामुळे भाजपसोबतच्या युतीमध्ये शिवसेना सडली हे उद्धव ठाकरे यांचे बोलणे चुकीचे होते.

मुळात ही युती हिंदुत्वाच्या नावाने झालेली असली तरी ती सत्तेसाठी झालेली होती. कारण शिवसेनेने त्यापूर्वी प्रयत्न केले होते, पण त्यांची ताकद कमी पडत होती. भाजप जरी राष्ट्रीय पक्ष असला तरी त्याची ताकद महाराष्ट्रात तोकडी पडत होती. अशा वेळी या दोन्ही पक्षांना सत्तेत येण्यासाठी एकमेकांची गरज होती. प्रादेशिक पातळीवर शिरकाव करणे हा शिवसेनेशी युती करण्याचा भाजपचा खरा हेतू होता. दोन्ही पक्षांना सत्ता हवी होती. त्यामुळे ते एकत्र आले. जेव्हा शिवसेनेकडे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखे प्रभावी नेतृत्व होते, तेव्हा युतीमध्ये त्यांची चलती होती. जेव्हा २०१४ सालानंतर नरेंद्र मोदी राष्ट्रीय पातळीवर आले तेव्हा भाजपची चलती आली. तेव्हा त्यांनी युतीमध्ये आपला हक्क गाजवायला सुरुवात केली. पण शिवसेनेला ते मान्य नव्हते. त्यामुळेच मग दोन्ही पक्षांमध्ये तणाव वाढून त्याचे रुपांतर फुटीमध्ये झाले.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदींनी भाजपला केंद्रात बहुमत मिळवून दिल्यानंतर भाजपला घटक पक्षांची तशी गरज राहिली नाही. त्यामुळे आपले महत्त्व हे नाममात्र आहे, हे भाजपप्रणित एनडीएमधील अन्य पक्षांच्या लक्षात आले. शिवसेनाही एक घटक पक्ष होता. लोकसभेनंतर महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर आता काहीही करून आपला मुख्यमंत्री बसवायचा ही भावना भाजपमध्ये प्रबळ झाली. त्यावेळी भाजप आणि शिवसेनेची युती तुटल्यानंतर हे दोन्ही पक्ष विधानसभा निवडणुकीत स्वतंत्रपणे उतरले. उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या केंद्रीय नेत्यांची मुसलमान सरदारांशी तुलना करून त्यांच्यावर टोकाची टीका केली, पण भाजपने सावध भूमिका घेतली. आपण यापुढे कधीही भाजपसोबत जाणार नाही, हे अगदी शपथेवर उद्धव ठाकरे यांनी प्रचारसभांमधून सांगितले होते. पण पुढे निवडणुकीनंतर शिवसेना भाजपसोबत राज्याच्या सत्तेत सहभागी झाली.

मंत्र्यांनी नेहमी राजीनामे देण्याचा बहाणा करत पाच वर्षे सत्ता उपभोगली. पुढे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी याच भाजपसोबत उद्धव ठाकरे यांनी निवडणुकीपूर्वी युती केली. निवडणूक झाल्यावर उद्धव ठाकरे यांचे असे म्हणणे होते की, भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी त्यांना बंद दाराआड मुख्यमंत्रीपद देण्याचे वचन दिले होते, पण भाजप आणि अमित शहा म्हणत होते की, आम्ही असे कुठलेही वचन त्यांना दिले नव्हते. याचा अर्थ २०१४ च्या विधानसभा निवडणूक प्रचारात मी पुन्हा भाजपसोबत जाणार नाही, असे जाहीर करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदासाठी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपसोबत का युती केली? याचा अर्थ त्यांनी स्वतःच्या स्वाथार्साठी भाजपशी युती केली. त्यामुळे आता ते म्हणत आहेत की, भाजपने आम्हाला फसवले, या विधानाला तसा अर्थ उरत नाही. ते म्हणतात, शिवसेना ही स्वाभिमानी संघटना आहे. तर मग त्यांनी आपला स्वाभिमान बाजूला ठेवून दोन वेळा भाजपच्या छत्रछायेखाली जाणे का पसंत केले? त्यामुळे आम्हाला त्यांनी फसवले असे बोलण्यात काही अर्थ नाही, कारण आमच्या स्वाथार्साठी आम्ही त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवला होता. त्यामुळे दगाफटका हा शब्द पुन्हा पुन्हा वापरण्याला अर्थ नाही. त्यांनी आम्हाला आमिष दाखवून आमची फसवणूक केली, पण त्यांच्या आमिषाला आम्ही बळी पडलो होतो, हेही वास्तव आहे.

# भारताची चिंता वाढणार



रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांविरोधात ५०० टक्क्यांपर्यंत आयातशुल्क (टॅरिफ) लावण्यासंबंधीच्या विधेयकाला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी तत्वतः मंजुरी दिली आहे. 'सँक्शनिंग रशिया ॲक्ट' नावाचे हे विधेयक पुढच्या आठवड्यात अमेरिकेच्या संसदेत अर्थात काँग्रेसमध्ये मांडले जाईल. या विधेयकाला डेमॉक्रॅट आणि रिपब्लिकन अशा सत्ताधारी व विरोधी पक्षातील ८४ जणांचा पाठिंबा असल्याचे म्हटले जाते. त्यामुळे हे विधेयक बहुमताने काँग्रेसमध्ये मंजूर होण्याची चिन्हे आहेत. हे विधेयक मंजूर होताच भारताची चिंताही पाचशे पटीने वाढणार आहे. २०२२ च्या फेब्रुवारी महिन्यात रशिया-युक्रेन युद्धाला सुरुवात झाली होती. यंदाच्या फेब्रुवारीत दोन्ही देशांमधील या युद्धाला ४ वर्षे पूर्ण होतील. तरीही हे युद्ध थांबण्याची चिन्हे नाहीत. चार वर्षापूर्वी युद्धाला तोंड फुटताच टिकलीएवढ्या युक्रेनला नमवायला रशियाला ४ दिवसही पुरेसे ठरतील, असे म्हटले जात होते. प्रत्यक्षात घडले उलटेच. रशियन सैन्य युक्रेनच्या सीमेलगतच्या प्रत्येक शहरांत मुसंडी मारत असताना युक्रेनचे सैन्य प्राणपणाने लढत होते. युक्रेनचा पाडाव झाल्यास रशिया युरोपच्या तोंडावर मांडी घालून बसण्याच्या भीतीने अमेरिका आणि युरोपियन देशांनी युक्रेनला युद्धसामुग्री आणि आर्थिक रसद पुरवठा सुरू केला, तसे युक्रेनियन सैन्यानेही चिवट संघर्षाच्या जोरावर रशियन सैन्याला अनेक भागांतून हुसकावून लावले. याच दरम्यान रशियाचे आर्थिक खच्चीकरण करण्याच्या उद्देशाने अमेरिकेसह युरोपियन देशांनी रशियावर ५०० हून अधिक निर्बंध लादले, व्यापारी संबंध तोडले, अनेक देशांमधील रशियाची बँक खाती गोठवण्यात आली. आर्थिक नाकेबंदी केल्यावर रशियाची युद्धखोरी कमी होईल, असा अमेरिकेचा कयास होता. मात्र, एवढे करूनही रशियन सैन्य नमलेले नाही, उलट युक्रेनवरील हल्ले दिवसेंदिवस तीव्र होत चाललेत. यामागे रशियन कच्चे तेल, नैसर्गिक वायू, युरेनियम व रेअर अर्थ मटेरियलचा मोठा हात असल्याचे म्हटले जात आहे. जेव्हापासून हे युद्ध सुरू झाले, तेव्हापासून रशियाने मित्र राष्ट्रांना अत्यंत स्वस्त दरात कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा करायला सुरुवात केली. यामध्ये प्रामुख्याने चीन, भारत, ब्राझील व आफ्रिकेतील काही देशांचा समावेश आहे. शिवाय हा व्यापारही अमेरिकन डॉलरऐवजी रशियाचे चलन रुबल किंवा त्या त्या स्थानिक देशाच्या चलनात होऊ लागला. या देशांनी रिफाइन केलेले कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू खुद्द युरोपियन देश विकत घेऊन आपल्या इंधन गरजा भागवत होते. तर दुसरीकडे अमेरिकाही रशियाकडून युरेनियम आणि रेअर अर्थ मटेरियल विकत घेतच होता. या देशांनी भारतावर रशियाकडून कच्चे तेल विकत घेण्याचा ठपका लावताच भारत आणि रशियाने वेळोवेळी ही दुटप्पी भूमिका उघड केली. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांना मिरच्या झोंबणे स्वाभाविकच होते. ट्रम्प यांना जागतिक शांतीदूत म्हणवून घ्यायची केवळ खुमखुमीच नाही, तर गळ्यात शांततेचे नोबेल पारितोषिक लटकवण्यासाठी त्यांची सातत्याने धडपड सुरू आहे. त्यातून त्यांनी भारत-पाक संघर्ष थांबवल्याचा दावा केला होता. गाझा-इस्रायल युद्ध, इस्रायल-इराण युद्ध, कंबोडिया-थायलंड युद्धही मीच थांबवले असे ते अधूनमधून सांगत असतात. अर्थात भारताने त्यांच्या दाव्यांना किंमत न दिल्याने ते भारतावर खार खाऊन आहेत. आपण सत्तेत येताच पाचव्या मिनिटाला रशिया-युक्रेन युद्ध थांबवू अशी पुडी त्यांनी सोडली होती. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेक शांतीचर्चा केल्या. व्लादिमिर पुतीनची भेटही घेतली, तरी त्यांना युद्धाचा गुंता सोडवण्यात यश आलेले नाही. हेच अपयश ट्रम्प यांना सातत्याने ठसठसत असून याचा दुहेरी राग ते भारतावर काढत आहेत. डोनाल्ड ट्रम्प हे पक्के बिझनेसमन. त्यामुळे आपल्या अटीशर्थींवर प्रत्येक देशाने द्विपक्षीय व्यापार करार करावा यासाठी त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार कराराचे उल्लंघन करत मनमानी पद्धतीने अनेक देशांवर टॅरिफ लादले. ज्यामध्ये भारताचाही समावेश आहे. भारतावर ट्रम्प प्रशासनाने व्यापार तुटीसाठी २५ टक्के, तर रशियाकडून कच्चे तेल विकत घेतल्यावरून अतिरिक्त २५ असा एकूण ५० टक्के टॅरिफ लादला. या टॅरिफच्या भीतीने ऑस्ट्रेलिया, जपानसारख्या काही देशांप्रमाणे भारतही झुकेल असे ट्रम्प यांना वाटत होते. परंतु, भारत अजूनही या दबावाला बळी पडलेला नाही. भारताने ट्रम्प यांच्या नाकावर टिच्चून डेअरी-फिशरी प्रॉडक्ट, ज्वेलरी, कृषी उत्पादने आदींसाठी पर्यायी बाजारपेठा शोधल्या. इंग्लंडपाठोपाठ ओमान, न्यूझीलंडसोबत द्विपक्षीय मुक्त व्यापार करारही केला. एवढेच नाही, तर वर्षअखेरीस पुतिन यांचा दौरा आयोजित करून त्यांच्यासोबत अनेक व्यापारी करार भारताने केले, त्यामुळे ट्रम्प यांची पोटदुखी वाढली आहे. त्यामुळेच आता ते भारतावर ५०० टक्क्यांपर्यंत टॅरिफ लादण्याच्या तयारीत आहेत. आतापर्यंत ५० टक्के टॅरिफ भारताने कसाबसा सहन केला, परंतु ५०० टक्के टॅरिफ म्हणजे डोक्यावरून पाणी जाणार आहे. भारतासाठी हा अत्यंत कसोटीचा काळ असणार आहे. भारताने रशियाकडून स्वस्त दरात कच्चे तेल विकत घेऊन ते आंतरराष्ट्रीय बाजारात विकण्याची प्रक्रिया शासकीयपेक्षा खासगीच अधिक होती. त्याचा फायदा खासगी तेल कंपन्यांनाच झाला. भारतात ना पेट्रोल-डिझेल स्वस्त झाले ना सीएनजी-पीएनजी. मागच्या दोन महिन्यांमध्ये भारताने रशियाकडून होणाऱ्या तेलाच्या आयातीत कपात केलीय खरी, पण ती तितकी आश्वासक नाही. भारतीय अर्थव्यवस्थेला अमेरिकेच्या दणक्यापासून वाचवायचे असेल तर रशियाकडील तेल खरेदी हळूहळू बंद केल्यावाचून पर्याय नाही. कारण एका हट्टापायी अनेक भारतीय उद्योगधंदे व प्रामुख्याने अमेरिकेसोबतचा द्विपक्षीय व्यापार करार धोक्यात येऊ शकतो. भविष्यात मोठी आर्थिक झेप घ्यायची असेल तर भारतासाठी दोन पावले मागे घेण्यातच शहाणपण आहे.

## कोको नानकटाई

**साहित्य :** १०० ग्रॅम मैदा, २० ग्रॅम कोको पावडर, १०० ग्रॅम पिठीसाखर, ७५ ग्रॅम पांढरे लोणी किंवा वनस्पती तूप, १/२ टीस्पून व्हॅनिला इसेन्स, १/४ टीस्पून बेकिंग पावडर.

**कृती :** पिठीसाखर-लोणी/तूप एकत्र करून हलके होईपर्यंत फेटून घ्या. मैद्यात बेकिंग पावडर, कोको पावडर टाकून चाळून घ्या. फेसलेल्या लोणीत चाळलेला मैदा व व्हॅनिला इसेन्स घाला. मिश्रणाचे लहान गोळे करा. ते दाबून जरा चपटे करून बेकिंग ट्रेमध्ये १ इंचाचे अंतर ठेवून मांडा. कन्व्हेक्शनवर मायक्रोवेव्ह प्रि-हीट करून १६० डिग्रीवर ५ मिनिटे बेक करा.



## स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी मेकअपच्या ‘या’ टिप्स येतील कामी, जाणून घ्या अधिक



**बहुतांश** वेळेस महिलांना प्रेग्नन्सीनंतर शरीरावर स्ट्रेच मार्क येतात. त्यामुळे एखादा शॉर्ट कुर्ता किंवा टी-शर्ट घातल्यास शरीरावरील स्ट्रेच मार्क दिसून येतात. असे झाल्यास आपल्याला स्ट्रेच मार्कमुळे अवघडल्यासारखे वाटते. यामुळे आपण काही वेळेस स्टायलिश कपडे घालण्याचा विचार करत नाही. स्ट्रेच मार्क हे त्वचेवर ताण पडल्यास निर्माण होतात. यामध्ये घाबरण्याची किंवा लाजण्याची काहीच गरज नाही. पार्टीसाठी तयार होण्यासाठी काही जण हेच स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी विविध उपाय करतात. तर जाणून घ्या स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी तुम्हाला मेकअपमधील काही सोप्या टिप्स कामी येतील. स्ट्रेच मार्क लपवण्याची वेळ आल्यास रंगांची विसंगती काही वेळेस होते. त्यामुळे जर तुमची त्वचा तांबड्या रंगाची असेल तर त्याला हलक्या रंगाच्या मेकअपमधील पिवळ्या रंगाची शेड लावून लपवू शकता. तसेच अंगावरील स्ट्रेच मार्क खूप जुने असल्यास त्याबाबतसुद्धा काळजी करण्याचे काहीच कारण नाही. अशावेळी तुम्ही तुमच्या स्कीन टोनप्रमाणे रंग निवडून स्ट्रेच मार्क लपवू शकता. स्ट्रेच मार्क लपवल्यानंतर त्यावरील मेकअप कायम राहावा यासाठी मेअकप ब्रशने त्यावर सेटिंग पावडर लावणे विसरू नका. तसेच मेकअप शिवाय तुम्ही सेल्फ-टॅनरच्या मदतीने सहजतेने लपवू शकता. असे केल्यास तुम्हाला स्ट्रेच मार्क दिसत असल्याचीही जाणीव होणार नाही आणि तुम्ही मोकळेपणाने पार्टी एन्जॉय करू शकता.



## केस गळती रोखेल कडीपत्ता आणि जास्वंद तेल

**केसगळती ही जागतिक समस्या आहे. बरेच उपाय करूनही केसगळती काही कमी होत नाही. पण आपण कडीपत्ता आणि जास्वंदाच्या तेलाच्या वापर केल्यास केस गळतीपासून काहीसा आराम मिळू शकतो. यासाठी आपल्याला याचे तेल बनवावे लागणार आहे. चला तर मग हे तेल कसे बनवायचे आणि त्याचा वापर कसा करायचा हे जाणून घेऊ या.**



**साहित्य-** १०० ग्रॅम नारळाचे तेल, ३-४ चमचे एरंडेल तेल, ४ -५ जास्वंदाचे फुले, ३ मूठ कडीपत्ता, ३ चमचे तीळ, ३ चमचे मेथीदाणा, १ वाटी किसलेला कांदा, किसलेला आवळा आणि आले.

**कृती :** सर्वप्रथम नारळाच्या तेलात कडीपत्ता, जास्वंदाची फुले, तीळ, मेथीचे दाणे, किसलेला कांदा, किसलेला आवळा, आले घालून गॅसवर मंद आचेवर ठेवावे. गॅस मंदच असावा. नाहीतर तेल जळू शकते. सर्व रसांचा अर्क नारळाचा तेलात उतरल्यावर गॅस बंद करून थंड होण्यासाठी ठेवावे. हे आयुर्वेदिक तेल आठवड्यातून दोनदा लावल्याने केसगळतीच्या त्रासापासून आराम मिळतो आणि केसगळती थांबते. गरज असल्यास एरंडेल तेलसुद्धा टाकावे. अजून चांगले परिणाम मिळतात.

## वाढत्या प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम
## जाणून घ्या प्रतिबंधात्मक उपाय

**वाढते** प्रदूषण हा जगभरातील मोठा धोका आहे. प्रदूषणामुळे लोक अनेक गंभीर आजारांना बळी पडत आहेत. वाढत्या वायू प्रदूषणामुळे फुफ्फुसाचे आजार, दमा, धाप लागणे, डोळे जळणे, घशातील संसर्ग, क्षयरोग असे गंभीर आजार होत आहेत. वाढत्या प्रदूषणाचा धोका लक्षात घेऊन जागतिक स्तरावर अनेक संस्था त्यावर उपाययोजना करत आहेत. पण एवढेच नाही तर प्रदूषणामुळे तुम्हाला शरीराशी संबंधित गंभीर आजार तर होतातच पण त्यामुळे तुमच्या मानसिक आरोग्यावरही वाईट परिणाम होत आहेत. ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, जगभरातील प्रदूषणामुळे १८ ते २५ वयोगटातील तरुणांना अनेक मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हवामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग आणि अनेक गंभीर आजारांशिवाय प्रदूषणाचा लोकांच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. वाढत्या प्रदूषणामुळे तरुणांना पर्यावरण चिंतेची समस्या भेडसावत आहे. प्रतिध्वनी चिंताची कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबद्दल तपशीलवार जाणून घेऊया.

### इको चिंता म्हणजे काय?

वाढत्या प्रदूषणामुळे शरीराला गंभीर आजार तर होत आहेतच, पण त्याचबरोबर ते मानसिक समस्यांनाही कारणीभूत ठरत आहे. वातावरणातील बदल, ग्लोबल वार्मिंग आणि वायू प्रदूषणाची वाढती पातळी यामुळे लोकांच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. अमेरिकन सायकियाट्रिक असोसिएशन (एपीए) च्या मते, पर्यावरण-चिंता ही अशी स्थिती आहे जी वाढत्या प्रदूषणामुळे आणि हवामानातील बदलांमुळे लोकांमध्ये चिंतेचे कारण बनते. त्यामुळे लोकांमध्ये अनिश्चित भीतीचे वातावरण निर्माण होऊन मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. चिंतेमुळे लोकांच्या कामावरही परिणाम होत असून त्यामुळे शारीरिक आरोग्यावरही परिणाम होत आहे. काही काळापूर्वी मानसशास्त्रज्ञांनी इको अॅन्झायटी दिली आहे आणि जगभर त्याविषयी बरीच चर्चा होत आहे. इको चिंतामुळे तुम्हाला आघात, तणाव, चिंता, नैराश्य आणि भीतीची भावना मुख्यतः १८ ते २५ वर्षे वयोगटातील लोकांमध्ये येत आहे.

### इको एंग्जायटीची कारणे

पर्यावरणाच्या समस्या, वाढत्या प्रदूषणामुळे शरीरावर आणि आरोग्यावर होणारे परिणाम या चिंतेमुळे लोक पर्यावरणाच्या चिंतेचे बळी ठरत आहेत. यापैकी सर्वात जास्त प्रभावित लोक १८ ते २५ वयोगटातील तरुण आहेत. याशिवाय, ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, पर्यावरणातील बदल, ग्लोबल वॉर्मिंग आणि पर्यावरणीय संकटे, भविष्यात नोकऱ्या आणि इतर संकटांमुळे लोकांमध्ये पर्यावरणाची चिंता वेगाने पसरते यामुळे लोकांच्या काळजीचे एक कारण म्हणजे ते थांबवण्यासाठी काही करत नाहीत असा लोकांचा समज आहे.

### पर्यावरण चिंता लक्षणे

वाढत्या प्रदूषणामुळे आणि पर्यावरणाशी संबंधित बदलांमुळे मानवावर अनेक परिणाम होत आहेत. याचा एक मोठा परिणाम म्हणजे यामुळे लोकांमध्ये पर्यावरणाच्या चिंतेची समस्या निर्माण होत आहे. इको चिंतेमुळे लोकांमध्ये दिसणारी लक्षणे खालीलप्रमाणे आहेत.

### जास्त काळजी

■ भीती आणि अनिश्चित भीतीची भावना ■ कनिष्ठतेची भावना ■ झोप समस्या ■ भूक मध्ये बदल ■ लक्ष केंद्रित करू शकत नाही

### इको एंग्जायटीपासून वाचण्याचे उपाय

इको चिंता टाळण्यासाठी, आपण प्रथम आपला आहार आणि आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे. याशिवाय, जर तुम्ही तुमच्या दिनचर्येतून थोडा वेळ काढू शकत असाल, तर तुम्ही पर्यावरणाशी संबंधित काही कामात स्वतःला झोकून दिले पाहिजे. याशिवाय तणाव किंवा चिंता यासारख्या मानसिक समस्या टाळण्यासाठी या गोष्टी लक्षात ठेवा.



■ मद्यपान आणि धूम्रपानापासून दूर राहावे.
■ कॉफी आणि कॅफिनयुक्त पदार्थांचे सेवन कमी करा.
■ उद्या किंवा भविष्याबद्दल जास्त काळजी करू नका.
■ नकारात्मक परिस्थिती आणि नकारात्मक विचारांपासून दूर राहा.
■ सकस आणि संतुलित आहार घ्या.
■ नियमित व्यायाम करा.

## इंटरनेटविना होईल ऑनलाइन पेमेंट! जाणून घ्या कशाप्रकारे वापरता येईल गुगल वॉलेट

**भारतात 5जी इंटरनेट कनेक्टिव्हिटी काही ठिकाणी कमी आहे. त्यापासून वाचण्यासाठी गुगलने वॉलेटमध्ये व्हर्च्युअल कार्ड जोडून एक नवीन पेमेंट सिस्टम सुरू केली आहे. या पेमेंट सिस्टममध्ये गुगल वॉलेटवरून इंटरनेटविना देखील पेमेंट करता येईल.**

**भारतात** सध्या ५जी इंटरनेट कनेक्टिव्हिटी सादर करण्यात आली आहे, परंतु तरीही काही ठिकाणी आजही इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध नाही. त्यामुळे गुगलची एक नवीन टेक्नॉलॉजी खूप उपयुक्त ठरू शकते. ज्यात इंटरनेटविना ऑनलाइन पेमेंट करता येईल. गुगलनं कॉण्टॅक्टलेस पेमेंट सिस्टम सादर केली आहे. यात गगुल वॉलेट व्हर्च्युअल कार्ड पेमेंटशी जोडले जाईल. या टेक्नॉलॉजीमध्ये गुगलला एकदा इंटरनेट कनेक्शन असताना कार्ड कनेक्ट करावा लागेल. त्यानंतर इंटरनेटविना पेमेंट करता येईल. कार्ड कनेक्ट झाल्यावर तुम्ही सिम्पल टॅप करून पेमेंट करू शकता.

**कशी वापरायची नवीन पेमेंट सिस्टम**

कॉण्टॅक्टलेस पेमेंटमध्ये कार्ड आणि कार्डविना फोन किंवा स्मार्टवॉचने पेमेंट करता येईल. जेव्हा तुम्ही गुगल वॉलेट ओपन करता तेव्हा एक डिफॉल्ट व्हर्च्युअल कार्ड दिसते. त्या पॉइंटवर फोन कार्ड डेटा रीडरपर्यंत पोहोचतो. जेव्हा तुमचा अँड्रॉइड फोन एनएफसी सिग्नल रीडरकडे पोहोचतो तेव्हा पेमेंट होतं.

तसेच जेव्हा तुम्ही ऑफलाइन असता तेव्हा तुमचा फोन कोणत्याही समस्येविना गुगल वॉलेटच्या एनएफसी-संचारित कोडचा वापर करून पेमेंट करतो. परंतु जर तुम्ही बराच काळ ऑफलाइन राहिलात तर पेमेंट नीट होत नाहीत.

**नोट :** ऑफलाइन पेमेंटसाठी गुगलला दर दोन दिवसांनी कमीत कमी एकदा इंटरनेटशी कनेक्ट व्हावं लागेल. ज्यामुळे तुम्ही बिनदिक्कत गुगल वॉलेटवरून ऑफलाइन पेमेंट करू शकाल.



**यूपीआय लाइटदेखील येईल वापरता**

रिझर्व्ह बँकेने गेल्या आठवड्यात यूपीआय लाइट लाँच केले. यूपीआय लाईट हे नियमित यूपीआयपेक्षा थोडे वेगळे आहे. हे एक ‘ऑन-डिव्हाइस वॉलेट’ वैशिष्ट्य आहे, जे वापरकर्त्यांना यूपीआय पिन न वापरता रिअल टाइममध्ये लहान रक्कम पेमेंट करण्याचा पर्याय उपलब्ध करून देते. यूपीआय लाइट लहान रकमेच्या व्यवहारांसाठी तयार केले आहे. त्यामुळे याद्वारे व्यवहाराची सर्वाधिक मर्यादा ५०० रुपये आहे. एनपीसीआय वेबसाइटनुसार यूपीआय लाइटद्वारे ५०० रुपयांपेक्षा कमी पेमेंटसाठी वापरकर्त्यांना यूपीआय पिनची गरज पडणार नाही. याशिवाय एनपीसीआयने म्हटले की, सुरुवातीला यूपीआय लाइट ऑफलाइन काम करेल.

## घरगुती क्रीम-साय

**सकाळी अंघोळ केल्यावर क्रीम लावले नाही तर एक-दोन तासांतच परत त्वचा ओढली जाते आणि कोरडीही होते. बाजारातल्या नवनवीन येणाऱ्या क्रीमचा वापर तर नेहमीच केला जातो. पण नेहमीच घरात उपलब्ध असणारे क्रीम म्हणजेच साय कधीतरी वापरून पाहा.**



- एक चमचा साय व लिंबाचा रस एकत्र करून रोज चेहऱ्यावर व ओठांवर लावल्यास ते फुटत नाही.
- थोडी साय व एक चमचा डाळीचे पीठ असे घरगुती उटणे साबणाला चांगला पर्याय आहे. त्यामुळे त्वचा मुलायम होते.
- मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेहऱ्यावर तसेच कोपऱ्यावर लावल्यास रंग उजळतो.
- तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावरच्या सुरकुत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.
- सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेहऱ्यावरची मुरमे बरी होतात.
- मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.
- एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेहऱ्यावर मालीश केल्यास चेहऱ्याचा रंग उजळतो.
- थंडीच्या दिवसात खोकल्याचा त्रासही वाढतो. अशा वेळी अर्ध्या वाटी सायीत एक चमचा नारळाचा किस पाच मोठे वेलदोडे (पावडर) तसेच 10 मिरे भरडून बारीक गॅसवर परतून गरम करावे व झोपण्यापूर्वी गरमगरम खावे. थोडे दिवस असे केल्यास कोरडा खोकला बरा होतो.
- काशाच्या किंवा पितळी ताटलीत दोन चमचे ताजी साय थोडे पाणी घालून खूप फेटावे. साय हलकी होऊन लोण्यासारखी मऊ होईल. त्यात एक कापराची वडी बारीक करून मिसळावी. फोड, जखम यावर हे मलम लावल्यास फायदा होतो. हेच मलम लहान मुलांच्या टाळूवर घालून हलक्या हाताने मालीश केल्यास टाळू लवकर भरते व गरमीच्या दिवसात डोळ्याला थंडावा मिळतो.

## तुम्ही झोपताना केस बांधून झोपता की मोकळे सोडून?

**तुमचे केस लांबलचक असतील तर दिवसभर त्यांची निगा राखण्यास भरपूर वेळ तुम्ही घालवत असाल... पण, रात्री झोपताना काय करायचं हा मात्र प्रश्न तुम्हाला अनेकदा पडत असेल.**

**केस** मोकळे सोडले तर केसांचा गुंता होणार... आणि तो सोडवताना केस तुटणार... आणि बांधून ठेवले तर केसगळती वाढणार. असा अनुभव तुम्हालाही आला असेल. पण, यावर उपाय म्हणजे तुमचे केस कसे आहेत यावर झोपताना ते कसे बांधावेत हे अवलंबून आहे.

**केस स्ट्रेट असतील तर...**

तुमचे केस मोकळे आणि सरळ असतील तर रात्रीच्या वेळेस तुम्ही सैलसर पोनीटेल बांधून ठेवू शकता. म्हणजे ते सकाळी फ्रिझी होत नाहीत. सैलसर वेणी बांधून ठेवल्यास केसांमध्ये गुंता होणार नाही. तसेच त्यांना नॅचरल टॅग्स मिळतील. तुमचे केस लांब असतील ते बांधून ठेवणे सोयीस्कर ठरते. पण खूप वेळ आणि घट्ट बांधून ठेवू नका. यामुळे केस तुटण्याची शक्यता अधिक आहे.



**केस ओले असतील तर...**

केस ओले असताना ते मूळीच बांधून ठेवू नका. परंतु केसांमधील गुंतागुंत कमी करण्यासाठी तुम्हाला ते बांधून ठेवणे गरजेचे वाटत असेल तर ते सुकल्यानंतरच बांधा. यामुळे ते तुटण्यापासून बचावतील. हाच नियम ब्लो ड्रायसाठीदेखील लागू होतो. शक्य असेल तर नैसर्गिकरीत्याच सुकवण्याचा प्रयत्न करा.

**कुरळ्या केसांसाठी**

तुमचे केस कुरळे असतील तर डोक्यावर त्याचा आंबाडा बांधा किंवा एका बाजूला बांधून ठेवा. यामुळे तुमची झोपमोड होणार नाही याची काळजी घ्या. पण तो खूप घट्ट बांधू नका.

## रोज एक टोमॅटो खाल्ल्याने होतात अनेक फायदे




**सॅलडमध्ये तसेच भाज्यांमध्ये टोमॅटोचा वापर केला जातो. मात्र तुम्हाला माहीत आहेत का रोज टोमॅटो खाण्याचे फायदे. ज्या आजारांवरील इलाज कठीण आहे, त्यावरही टोमॅटो गुणकारी आहे.**

- हृदयासंबंधित रोगांपासून बचाव होतो.
- युरिन इन्फेक्शनपासून बचाव तसेच रक्तशुद्धी होते.
- पचनशक्ती वाढते. पालकाच्या रसात टोमॅटोचा रस मिसळल्याने बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.
- टोमॅटोमध्ये असलेल्या व्हिटॅमिन ‘के’मुळे हाडे मजबूत होतात. तसेच बोन टिश्यू रिपेअर होण्यास मदत होते.
- अँटीऑक्सिडंटचे भरपूर प्रमाण असलेल्या टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन ‘सी’ आणि ‘ए’ असते. व्हिटॅमिन ‘ए’ डोळ्यांसाठी तसेच डिहायड्रेशनसाठी चांगले.
- केसांना चमकदार तसेच मजबूत बनवण्यासाठीही टोमॅटो फायदेशीर आहे.
- त्वचेला उजाळा मिळवून देण्यासाठी टोमॅटो खाणे चांगले.
- बिया नसलेल्या टोमॅटोचा सॅलडमध्ये वापर केल्यास किडनी स्टोनची शक्यता कमी होते.
- प्रतिकारक्षमता वाढते. तसेच तणावापासून दूर रोखण्यासाठीही टोमॅटो लाभदायक आहे.
- स्मोकिंगमुळे शरीराला होणाऱ्या नुकसानापासून वाचण्यासाठीही टोमॅटोचे सेवन फायदेशीर ठरते.




## क्रॅटोमच्या पूरक औषधांनी आरोग्यावर दुष्परिणाम



**काही** वनौषधी कृत्रिम पूरकांच्या स्वरूपात घेतल्यास त्याचे आरोग्यावर वाईट परिणाम होतात, असे दिसून आले आहे. परदेशात जास्त वापरल्या जाणाऱ्या क्रॅटोम या वनौषधीच्या पूरकांमुळे आरोग्याची हानी होत असल्याचे पुरावे समोर आले आहेत. क्रॅटोम ही वनस्पती परदेशात लोकप्रिय असून तिचे वैज्ञानिक नाव मिट्रॅगना स्पेसिओसा आहे. ती कॉफी वर्गातील वनस्पती आहे. ऊर्जा वाढवणे व वेदना कमी करणे या दोन कारणास्तव आग्नेय आशियात मजूर लोक या वनस्पतीची पाने चावून खातात. क्रॅटोमचा वापर अमेरिकेत बेकायदेशीर मानला जात नाही. लोक ऑनलाइन त्याची खरेदी करतात. हिरव्या पावडरच्या स्वरूपात ही पूरक औषधी मिळते. क्रॅटोमचा अर्क सुरक्षित व नैसर्गिक मानला जातो. पण तो शरीरात गेल्यानंतर निष्क्रिय राहात नाही, असे संशोधकांचे मत असून अमेरिकेत त्याचा वापर अनेक वर्षे सुरू आहे. काही जण त्याचा वापर नैराश्यावर करतात, तर काहींना वेदना कमी करण्यास फायदा होतो. त्यात मिट्रॅग्नाइन हा ओपिऑइड पदार्थ असतो. या औषधीच्या वापरासाठी कुठलेही वैद्यकीय पुरावे नसले तरी त्याचा वापर अफूसारखा केला जातो. बुप्रेनोफाइनपेक्षा ही औषधी स्वस्त असते. न्यूयॉर्क विद्यापीठाचे विल्यम एगलस्टन यांनी याबाबत केलेल्या संशोधनानुसार याचे काही विषारी परिणाम हे ते औषध बंद केल्यानंतर दिसून येतात. ‘जर्नल फार्माकोथेरपी’ या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. १ जानेवारी २०११ ते ३१ जुलै २०१८ दरम्यान लोकांनी या औषधाच्या केलेल्या वापराची माहिती घेऊन हे संशोधन करण्यात आले. त्यातून असे दिसून आले की, चिडचिडेपणा, गोंधळणे, वांत्या, भ्रम, कोमात जाणे, हृदयविकार असे परिणाम यातून होतात.

## आंब्याच्या पानांनी बनलेल्या चहाचे सेवन केल्याने गायब होतील आजार, जाणून घ्या याची रेसिपी

**आंब्याला फळांचा राजा म्हटले जाते. आंबा खाण्यास जेवढा चविष्ट असतो, तेवढाच आरोग्यासाठीदेखील फायदेशीर असतो. एवढंच नव्हे तर आंब्याच्या पानांमध्ये देखील बरेच गुण असतात. या पानांमध्ये बरीच व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. यात उपस्थित मंगिफेर्न नावाचा पदार्थ आरोग्यासाठी फारच फायदेशीर असतो. तुम्ही या पानांचा चहा बनवून त्याचे सेवन करू शकता. यामुळे पोटाशी निगडित बऱ्याच प्रकारचे आजार दूर होतात. आंब्याच्या पानांचा चहा तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.**



**आंब्याच्या पानांच्याचहाची रेसिपी :** हा चहा तयार करण्यासाठी आंब्याची पाने घ्या. ही पाने पाण्यात टाकून पाणी अर्धे होईस्तोवर उकळा. या पानांचा आपला वेगळा फ्लेव्हर असतो. म्हणून यात साखर मिसळायची गरज नसते. तुम्हाला हवे असेल तर यात आंबा किंवा पेरूचा रस मिसळू शकता. यानंतर या चहाला कपात गाळून घ्या आणि गरमागरम याचे सेवन करा.

**पोट ठेवेल निरोगी :** पोटाला निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही आंब्याची पाने पाण्यात टाकून उकळा आणि य पाण्याला एखाद्या भांड्यात रात्रभर ठेवा. दुसऱ्या दिवशी सकाळी या पाण्याला गाळून उपाशीपोटी याचे सेवन करा. याचे नियमित सेवन केल्याने पोटाशी निगडित सर्व समस्या दूर होण्यास मदत मिळेल.

**व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर होईल :** व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर करण्यासाठी आंब्याच्या पानांना आधी पाण्यात उकळून याचा चहा तयार करून त्याचे सेवन करा. यात तुम्ही पेरू किंवा आंब्याचा रसदेखील घालू शकता.

**अस्थमाच्या रुग्णांसाठी फायदेशीर :** आंब्याच्या पानांना उकळून त्या पाण्यात मध मिसळून त्याचे सेवन केल्याने ब्रॉन्कायटिस आणि अस्थमाची समस्या दूर होण्यास मदत मिळते. हा चहा खोकल्याला प्रभावीपणे ठीक करतो.

**ब्लडप्रेशरसाठी फायदेशीर :** उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांसाठी देखील आंब्याच्या पानांचा चहा तसेच आंब्याची पाने टाकून उकळलेल्या पाण्याने अंघोळ करणे फायदेशीर असते.

**मधुमेह रोग्यांसाठी फायदेशीर :** आंब्याच्या पानांमध्ये एंथोसाइनिडिन नावाचे टॅनिन असते, जे सुरुवातीच्या मधुमेहाच्या उपचारात मदत करते. आंब्याच्या वाळलेल्या पानांची पूड करून काढा बनवून त्याचाही प्रयोग केला जातो, जो मधुमेह अँजियोपॅथी आणि मधुमेह रेटिनोपॅथीच्या उपचारात देखील मदत करतो.

# ठाण्यातील घोडबंदर व्होटर स्लिपमध्ये घोळ
## नाव, अनुक्रमांक बरोबर... पत्ते मात्र बदलले

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

ठाणे महापालिका निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली असताना, अद्यापही अनेक ठाणेकरांच्या हाती अधिकृत व्होटर स्लिप पोहोचल्या नसल्याची बाब समोर आली आहे. तर ज्या मतदारांना स्लिप मिळाल्या आहेत, त्यामध्येही मोठ्या प्रमाणावर घोळ आढळून आला असून, नाव आणि अनुक्रमांक योग्य असले तरी पत्ते बदलले असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, निवडणूक व्यवस्थेतील घोळ शेवटच्या टप्प्यातही उघडकीस आला आहे.



ठाण्यातील घोडबंदर भागातील ब्रह्मांड, हिरानंदानी इस्टेट, ऋतुपार्कसह इतर परिसरातील अनेक मतदारांच्या नावापुढे छापण्यात आलेल्या पत्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर चूक झाल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे मतदार यादीतील नाव आणि अनुक्रमांक अचूक छापण्यात आले आहेत; मात्र त्यापुढे असलेला पत्ता हा दुसऱ्याच इमारतीचा किंवा वेगळ्या ठिकाणचा नमूद करण्यात आला आहे. अनेक प्रकरणांमध्ये फ्लॅट क्रमांकही चुकीचा छापून आल्याचे आढळून आले आहे.

या चुकीच्या पत्त्यांमुळे अनेक मतदारांच्या व्होटर स्लिप दुसऱ्याच इमारतींमध्ये जात असल्याचे चित्र आहे. संबंधित पत्त्यावर नाव शोधण्याचा प्रयत्न केला असता, अशी व्यक्ती त्या इमारतीत राहतच नसल्याचे समोर येत आहे. परिणामी, व्होटर स्लिप वाटप करणाऱ्यांचाही गोंधळ उडाला असून, विविध राजकीय पक्षांकडून वाटण्यात येणाऱ्या स्लिप्स चुकीच्या पत्त्यांवर पोहोचत आहेत.

या संदर्भात हिरानंदानी इस्टेट परिसरात वास्तव्यास असलेले प्रदीप राव यांनी सांगितले की, "माझ्या घराचा पत्ता व्होटर स्लिपवर चुकीचा दाखविण्यात आला आहे. मतदानावेळी ओळखपत्र सादर करताना पत्ता जुळला नाही, तर मतदान करता येईल की नाही, याची चिंता वाटत आहे."

दरम्यान, मतदानासाठी आता अवघे काही तास शिल्लक असताना देखील महापालिका प्रशासनाकडून वाटप करण्यात येणाऱ्या अनेक व्होटर स्लिप अद्याप मतदारांपर्यंत पोहोचलेल्या नसल्याचे दिसून येत आहे. मात्र, महापालिकेकडून व्होटर स्लिपचे वाटप सुरू असल्याचा दावा करण्यात येत आहे.

यासंदर्भात ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी सांगितले की,आम्ही विधानसभेच्या मतदार यादीच्या आधारेच काम केले आहे. त्यामधील उपलब्ध माहितीनुसारच व्होटर स्लिप तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे हा घोळ आमचा नसून, व्होटर स्लिपचे वाटप सुरू असून ते पूर्ण केले जाईल.

### ठाण्यात आचारसंहितेच्या १६ तक्रारी दाखल

आचारसंहिता भंगाच्या एकूण १६ तक्रारी ठाणे महापालिकेच्या अंमलबजावणी पथकाकडे प्राप्त झाल्या असून, त्यापैकी १४ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. उर्वरित दोन तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून म्हणजेच १५ डिसेंबरपासून ठाणे शहरात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आचारसंहितेचे काटेकोर पालन व्हावे, यासाठी महापालिकेच्या निवडणूक विभागाकडून नोडल अधिकारी, फ्लाइंग स्कॉड तसेच सर्व्हिलन्स पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकांमार्फत शहरातील विविध भागांत नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. या तपासणीत १५ डिसेंबर ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत ठाणे शहरात केवळ ९ हजार ५४० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. मात्र, कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणावर मद्य आणि अमली पदार्थांवर प्रशासनाने हात टाकला आहे. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, १७ लाख ५६ हजार रुपयांच्या किमतीचे १६ हजार ८३९ लिटर मद्य जप्त करण्यात आले असून, तब्बल ९ कोटी ६६ लाख ९० हजार रुपयांचे अमली पदार्थही हस्तगत करण्यात आले आहेत. याशिवाय निवडणूक काळात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी एकूण १ हजार ४६३ प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्याची माहिती ठाणे महापालिकेने दिली आहे.

## आठ वर्षांनी बोटाला 'शाई'! ठाण्यात १६ लाख मतदार निवडणार कारभारी, कोण उधळणार विजयाचा गुलाल?

कर्मचाऱ्यांची धावपळ... ईव्हीएम मशीन्सची टिकटिक... अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन... अशा लगबगीच्या वातावरणात ठाण्यात विविध ठिकाणी चोख पोलिस बंदोबस्तात ईव्हीएम मशिन्स, निवडणुकांची इतर आवश्यक साधनसामुग्री बुधवारी मतदान केंद्रांवर दाखल झाली. पहाटेपासून हे सर्व साहित्य, ड्युटीच्या ठिकाणी जमा झालेले शेकडो कर्मचारी आणि पोलिस अधिकाऱ्यांनी मतदान केंद्रांवर नेत केंद्राचा ताबा घेतला. ठाणे महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी गुरुवारी सकाळी साडेसातपासून मतदानाला सुरुवात होणार आहे. यंदा गेल्या निवडणुकीप्रमाणेच एकूण चार मते मतदारांना द्यावी लागणार आहेत. त्यातील विविध सिस्टीमबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून प्रभाग क्रमांकनिहाय झोनमधील सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी एकूण चार मते देणे बंधनकारक असून ईव्हीएम मशीनबाबत व मतदारांच्या प्रश्नांना उत्तरे देणे, आवश्यक कागदपत्रांच्या अतिरिक्त प्रती सोबत बाळगणे, मतदान सुरू होण्याआधी तसेच मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ईव्हीएमची योग्य तपासणी करणे आदी महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात आली.

**सखी व आदर्श मतदान केंद्र :** सखी मतदान केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे या केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी १.२ व ३, शिपाई व पोलिस कर्मचारी देखील महिलाच असणार आहेत. संपूर्णपणे महिला चालवित असलेले हे मतदान केंद्र असून या मतदान केंद्राचा गुलाबी रंग असणार असून फुगे व आकर्षक सजावट येथे करण्यात येणार आहे. पिंक बूथ अशी देखील या मतदान केंद्राची ओळख आहे. सर्व सुविधायुक्त असे आदर्श मतदान केंद्र देखील तयार करण्यात आले आहे.

**मतमोजणी ११ ठिकाणी :** प्रभाग या निवडणुकीची मतमोजणी शुक्रवार, १६ जानेवारी रोजी होणार आहे. ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी ११ विभागनिहाय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून मतमोजणी १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजल्यापासून होणार असल्याची माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी दिली.

### ठाणे महापालिका

- एकूण प्रभागांची संख्या ३३
- चार सदस्यीय प्रभाग संख्या ३२
- तीस सदस्यीस प्रभाग संख्या १
- एकूण जागा १३१
- एकूण मतदारांची संख्या १६,४९,८६८
- पुरुष मतदार ८,६३,०००
- महिला मतदार ७,८५,८३०
- इतर मतदार १५९
- मतदान केंद्र २,०१३
- निवडणूक कामाजासाठी नियुक्त कर्मचारी १२ हजार ६५०

## कळंबोलीत 'लाडकी बहीण' मेळाव्यातून आचारसंहिता भंग
## भाजपच्या चार उमेदवारांविरोधात गुन्हा दाखल

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

१५ जानेवारी रोजी होणाऱ्या पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कळंबोलीतील प्रभाग क्रमांक ७, ८, ९ व १० मध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'लाडकी बहिण' मेळाव्यातून आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी भारतीय जनता पार्टीच्या (महायुती) चार उमेदवारांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आचारसंहिता भंग केल्याचा आरोप असलेल्या भाजपच्या उमेदवारांमध्ये अमर अरुण पाटील, प्रमिला रविनाथ पाटील, मनाली अमर ठाकूर आणि राजेंद्र शर्मा यांचा समावेश आहे. संबंधित चारही उमेदवारांनी दि. १२ जानेवारी रोजी सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत कळंबोली सेक्टर-१६, रोडपाली येथील नवीन बस डेपो परिसरात ह्यलाडकी बहिणह्ण मेळावा, हळदी-कुंकू तसेच लकी ड्रॉ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमादरम्यान उपस्थित महिलांना लकी ड्रॉच्या माध्यमातून पैठणी साडी देण्याचे प्रलोभन दाखवून मतदान करण्याचे आवाहन करण्यात आल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. हा प्रकार थेट मतदारांवर प्रभाव टाकणारा असून, तो आदर्श आचारसंहितेचा स्पष्ट भंग असल्याचे निवडणूक यंत्रणेचे म्हणणे आहे. या संदर्भात प्रभाग क्रमांक ७, ८, ९ व १० चे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विनय शिपाई (३९) यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार चारही उमेदवारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सततच्या छळामुळे नैराश्यात, विद्यार्थीनीची आत्महत्या, कुटुंबियांचे गंभीर आरोप

■मुंबई। प्रतिनिधी,

कर्नाटकची राजधानी बेंगळुरू येथील अनेककल परिसरातील एका खासगी डेंटल कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. २३ वर्षीय यशस्विनी हिने आत्महत्या करत आयुष्य संपवल्याची माहिती पोलीस तपासात समोर आलीये. या घटनेनंतर कॉलेज परिसरात तसेच विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना असून, निष्पक्ष चौकशीची मागणी होत आहे.



दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार यशस्विनीच्या आईकडून कॉलेज प्रशासनाविरोधात कोणतीही अधिकृत तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. या आधारावर पोलिसांनी 'अकस्मात मृत्यू अहवाल' नोंदवला असून, मृत्यूमागची नेमकी कारणं शोधण्यासाठी तपास सुरू आहे, असं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यशस्विनी ही बंगळुरू ग्रामीण जिल्ह्यातील अनेककल भागात असलेल्या एका खासगी डेंटल कॉलेजमध्ये ओरल मेडिसिन आणि रेडियोलॉजी विभागाची तिसऱ्या वर्षाची विद्यार्थिनी होती. शुक्रवारी ती आपल्या घरी मृत अवस्थेत आढळून आली. घटनेची माहिती समजताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि प्राथमिक पंचनामा करण्यात आला.

यशस्विनीच्या मृत्यूची बातमी कॉलेज परिसरात पसरताच अनेक विद्यार्थी एकत्र जमले आणि कॉलेज व्यवस्थापनाला जाब विचारला. संस्थात्मक दबावामुळेच ही घटना घडली असावी, असा संशय काही विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. यामुळे काही काळ परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. मात्र परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप केला.

दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार यशस्विनीच्या आईकडून कॉलेज प्रशासनाविरोधात कोणतीही अधिकृत तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. या आधारावर पोलिसांनी 'अकस्मात मृत्यू अहवाल' नोंदवला असून, मृत्यूमागची नेमकी कारणं शोधण्यासाठी तपास सुरू आहे, असं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

मात्र दुसरीकडे, कुटुंबीयांनी मानसिक छळाचे आरोप केल्याचंही समोर येत आहे. यशस्विनी ही परिमला आणि भुदेवय्या यांची एकुलती एक मुलगी होती. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, कॉलेजमध्ये झालेल्या अपमानास्पद वागणुकीमुळे ती मानसिक तणावाखाली होती. यशस्विनीच्या आई परिमला यांनी सांगितले की, बुधवारी डोळ्यांमध्ये तीव्र वेदना असल्याने तिने कॉलेजमधून रजा घेतली होती. त्यानंतर ती पुढच्या दिवशी कॉलेजमध्ये गेली असता, सेमिनारमध्ये सहभागी न झाल्याच्या कारणावरून तिला इतर विद्यार्थ्यांसमोर अपमानित करण्यात आलं.

कुटुंबीयांचा आरोप आहे की एका लेक्चररने तिला सेमिनारमध्ये सहभागी होण्यापासून रोखलं आणि प्रेझेंटेशन न दिल्याबाबत सातत्याने तिला त्रास दिला. शिवाय तिच्या रंगावरुन तिला सावळी असल्याचे टोमणेही मारण्यात येत होते. याच घटनेनंतर ती प्रचंड मानसिक धक्क्यात गेली होती, असं कुटुंबीयांनी म्हटलं आहे.

## आंबेडकर चौक ते नीलसृष्टी मार्ग महिनाभर बंद



### प्रशासनाचे आवाहन

जिल्हा प्रशासन आणि वाहतूक पोलिसांच्या सहकार्याने ही नवीन व्यवस्था राबविली जात आहे. अपर जिल्हादंडाधिकाऱ्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, प्रवासाचे नियोजन करताना या बदलांची नोंद घ्यावी आणि रस्ता कामासाठी प्रशासनास सहकार्य करावे. स्थानिक पातळीवर आणि ग्रामीण भागात या अधिसूचनेची व्यापक प्रसिद्धी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

■पालघर। प्रतिनिधी,

पालघर शहरातील मुख्य रस्त्यांपैकी एक असलेल्या आंबेडकर चौक ते नीलसृष्टी अपार्टमेंट दरम्यान सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. या कामामुळे नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतुकीची सुसूत्रता राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष वाहतूक नियंत्रण अधिसूचना लागू केली आहे. ही सूचना ८ जानेवारी ते ५ फेब्रुवारी (रात्री १२ वाजेपर्यंत) अमलात राहणार आहे. या काळात सदर मार्गावरून सर्व प्रकारच्या वाहनांच्या प्रवेशावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. रस्त्याचे कॉंक्रिटीकरण सुरू असताना अपघात टाळण्यासाठी आणि कामात व्यत्यय येऊ नये, यासाठी हा मार्ग बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जड आणि हलकी अशा दोन्ही प्रकारच्या वाहनांना या बंद मार्गावरून जाण्यास मनाई असून, नियम मोडणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

### वाहनचालकांसाठी पयार्यी मार्ग

- मार्ग १ : पालघर रेल्वे स्टेशन – जगदंबा हॉटेल – वीर सावरकर चौक (वळण चौक) मार्गे आंबेडकर चौक.
- मार्ग २ : पालघर रेल्वे स्टेशन – पृथ्वीराज चौक झ्र शिवाजी महाराज चौक मार्गे आंबेडकर चौक.

## संशयाच्या भूतानं पछाडलं, बायकोला दगडाने ठेचून संपवलं अन् पतीची आत्महत्या, ४ मुलं झाली अनाथ

■गडचिरोली। प्रतिनिधी,

गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यात घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत पतीने तिची दगडाने ठेचून निर्घृण हत्या केली आणि त्यानंतर स्वतःही आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या दुर्दैवी प्रकारामुळे चार निष्पाप मुलांच्या डोक्यावरून आई-वडिलांचे छत्र हरपले असून, संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

धानोरा तालुक्यातील दुर्गम भाग असलेल्या रोपीनगड्डा गावातील रहिवासी कनिष्ठा राकेश कुजूर (वय ३२) आणि राकेश सुकणा कुजूर (वय ३७) हे या घटनेतील मृत दाम्पत्य आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ५ जानेवारी रोजी दोघेही शेतात धान कापणीचे काम आटोपून "घरी जातो" असे सांगून निघाले होते. मात्र, त्यानंतर ते घरी पोहोचलेच नाहीत. दोन दिवसांनंतर, ७ जानेवारीला गावाजवळील गागीरमेटा डोंगर परिसरात कनिष्ठा कुजूर यांचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह आढळून आला. त्यांच्या डोक्यावर दगडाने जोरदार वार करण्यात आल्याचे स्पष्ट झाले.

पत्नीचा मृतदेह सापडल्यानंतर पती राकेश कुजूर याचा शोध सुरू करण्यात आला. अखेर ८ जानेवारी रोजी राकेशचा मृतदेह त्याच्याच शेतात आढळून आला.



प्राथमिक तपासात पत्नीच्या हत्येनंतर पश्चात्ताप, भीती किंवा अटकेच्या भीतीपोटी त्याने विष प्राशन करून आत्महत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर धक्कादायक बाब समोर आली आहे. राकेश कुजूर याला पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेण्याची सवय होती. दारूच्या नशेत तो वारंवार पत्नीशी भांडण करत असे. त्यांच्या वादांमुळे गावात तणाव निर्माण झाला होता. याच कारणामुळे गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात गावात पंचायतही बसवण्यात आली होती. त्या वेळी राकेशला समज देण्यात आली होती आणि काही काळ परिस्थिती शांतही झाली होती. मात्र, पुन्हा एकदा संशयाच्या भुताने त्याचा ताबा घेतला आणि सुखी कुटुंबाचा अंत झाला.

या घटनेत मानवी (१२), मेहमा (९), अर्णव (७) आणि शालिनी (५) ही चार लहान मुले अनाथ झाली आहेत. यातील तीन मुले देऊळगाव येथील आश्रमशाळेत शिक्षण घेत आहेत. आई-वडिलांचे छत्र हरपल्यानंतर आता या चारही मुलांच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्या ८० वर्षीय आजोबा सुकणा कुजूर यांच्या खांद्यावर आली आहे. उतारवयात मुलगा-सून गमावल्यानंतर नातवंडांच्या भविष्याची चिंता त्यांना भेडसावत आहे.

या प्रकरणी पेंढरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी गोपीचंद लोखंडे यांनी सांगितले की, "कौटुंबिक वाद आणि चारित्र्याच्या संशयातून पतीने पत्नीची हत्या केली असून, त्यानंतर स्वतः आत्महत्या केली आहे. घटनेचा सखोल तपास सुरू आहे." या दुर्दैवी घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, समाजमनाला हादरवून टाकणारा हा प्रकार ठरला आहे.

## अजमेर येथील वादातून रक्तरंजित सूड
## वाशीतील कोपरी गावात तरुणाची हत्या




■नवी मुंबई। प्रतिनिधी,

अजमेर येथे झालेल्या वादाचा राग मनात धरुन ११ तरुणांच्या टोळक्याने वाशीतील कोपरी गावात राहणाऱ्या तरुणावर धारदार शस्त्रांनी सपासप वार करुन त्याची निर्घृण हत्या केल्याची खळबळजनक घटना मंगळवारी रात्री कोपरी गावात घडली. या प्रकरणी एपीएमसी पोलिसांनी ११ जणांविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करुन ४ संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी आता इतर आरोपींचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील मृत तरुणाचे नाव अमित यादव असून तो वाशीतील कोपरी गावात राहण्यास होता. अमित यादव हा गत २६ डिसेंबर रोजी आपल्या मित्रांसोबत अजमेर येथे गेला होता. तेथे एका इमारतीच्या टेरेसवर वास्तव्यास असताना खैरणे बोनकोडे येथे राहणाऱ्या सोहेल शेख व त्याच्या साथीदारांसोबत अमित व त्याच्या मित्रांचा किरकोळ वाद झाला होता. त्यावेळी सोहेल शेख व त्याच्या साथिदारांनी नवी मुंबईत आल्यानंतर बघून घेण्याची धमकी दिली होती. अजमेर येथून हे सर्व मित्र नवी मुंबईत आल्यानंतर मंगळवारी अमित यादव आपल्या मित्रांसोबत बोनकोडे येथील अय्यप्पा मंदिर परिसरात बसलेला असताना अजय निर्मल, सोहेल शेख व प्रकाश तेथे गेले होते. त्यावेळी अमित यादव याने अजमेर येथे झालेल्या वादाचा जाब त्यांना विचारला असता, ते तिघे त्याच्या अंगावर मारण्यासाठी धावून गेले. यावेळी अमित यादव याने सोहेल शेख याच्या कानाखाली चापट मारली, त्यानंतर तिघांनी परत येतो, अशी धमकी देऊन तेथून निघून गेले. त्यानंतर रात्री सुमारे ११.३० वाजता अमित यादव हा त्याच्या मित्रांसोबत कोपरीगाव साईबाबा मंदिराजवळ उभा असताना, त्याठिकाणी पाच मोटारसायकलींवरुन आलेल्या टोळक्याने अमित यादव याच्यावर हल्ला चढवला.

यावेळी वसिम राईन, अजय निर्मल व सोहेल शेख यांनी त्यांच्याजवळ असलेल्या धारदार शस्त्राने अमितवर सपासप वार केले, तर इतरांनी त्याला घेराव घालून बेदम मारहाण केली. त्यानंतर सर्व मारेकरी त्याठिकाणावरुन पळून गेले. रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या अमितला त्याच्या मित्रांनी रिक्षाने वाशीतील महापालिकेच्या रुग्णालयात नेले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर एपीएमसी पोलिसांनी ११ आरोपींविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करुन चार आरोपींना ताब्यात घेतले आहे.

## मृतदेहाचे तुकडे खाण्यासाठी अज्ञात व्यक्तीची केली हत्या

■मुंबई। प्रतिनिधी,

पश्चिम बंगालच्या कूचबिहार जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका व्यक्तीने मृतदेहाचे तुकडे खाण्यासाठी एका अज्ञात व्यक्तीची हत्या केली. पोलीस अधिकाऱ्यानं दावा केला की, चौकशीदरम्यान, आरोपीने पीडितेचं मांस खाण्याच्या हेतूने हत्या केल्याचा कबुलीनामा दिला. ही घटना कूचबिहार जिल्ह्यातील दिनहाट येथील कुर्शत परिसरात घडली, यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं.

### नेमकं काय घडलं?

पोलिसांनी सांगितलं की, मृताची अद्याप ओळख पटवण्याचा पोलीस प्रयत्न करत आहेत. मृत व्यक्ती ही परिसरातील स्मशानभूमीजवळील असलेल्या एका झोपडीत राहत होती. कुर्शात येथील एका तलावत तो मृतावस्थेत आढळला. वृत्तानुसार, मतदेह आढळून आल्यानंतर पोलिसांनी तपास सुरु केला. संशयित आरोपीचं नाव दौस आलम असल्याचं सांगण्यात येत आहे. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

### आरोपीने 'त्या' गोष्टीसाठी अज्ञात व्यक्तीची केली हत्या

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दारूच्या नशेत असून या प्रकरणात पोलिसांनी दावा केला की, आरोपीने अज्ञात व्यक्तीची हत्या करण्यात आली होती, नंतर मृतदेह हा पाण्याच्या टाकीत नेला, तो स्वच्छ करत लपवण्यात आला. चौकशीदरम्यान. आरोपीने हत्येचा कबुलीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीने

## राहिलेले ३०० रुपये शोधताना, ९३ हजारांचा फटका
### कस्टमर केअरच्या नावाखाली दादरच्या व्यापाऱ्याची ऑनलाइन फसवणूक

■मुंबई। प्रतिनिधी,

ऑनलाइन पेमेंटमुळे व्यवहार सोपे झाले असले तरी त्याच माध्यमातून फसवणूकही वाढत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. दादरमधील एका कापड व्यावसायिकाला केवळ ३०० रुपयांची रक्कम परत मिळवण्याच्या प्रयत्नात तब्बल ९३,२६० रुपयांचा आर्थिक फटका बसला. बनावट पेटीएम कस्टमर केअर प्रतिनिधीने व्हिडिओ कॉलद्वारे ही फसवणूक केल्याचे उघड झाले आहे.




प्राथमिक तपासात व्हिडिओ कॉलदरम्यान स्क्रीन शेअरिंग किंवा फिशिंग लिंकच्या माध्यमातून आरोपीने मोबाईलचा ताबा मिळवल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. ट्रान्झॅक्शन आयडी आणि संबंधित मोबाईल नंबरच्या आधारे पोलिस आरोपीचा शोध घेत आहेत. या घटनेमुळे ऑनलाइन पेमेंट करताना आणि कस्टमर केअरच्या नावाखाली येणाऱ्या कॉल्सबाबत सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

दादरच्या डीसिल्वा रोड परिसरात महिलांच्या रेडीमेड कपड्यांचे दुकान चालवणारे नरेश यमाजीराव महिंद्रकर (६७) यांनी या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. ११ जानेवारी रोजी रात्री त्यांच्या दुकानात आलेल्या एका ग्राहकाने २,२५० रुपयांची खरेदी केली. त्यापैकी १,५०० रुपये रोख देण्यात आले, तर उर्वरित ७५० रुपये पेटीएमद्वारे देण्याचे सांगण्यात आले. मात्र प्रत्यक्षात केवळ ४५० रुपयेच खात्यात जमा झाले.

रात्री हिशोब करताना ३०० रुपये कमी असल्याचे लक्षात आल्यानंतर दुसऱ्या दिवशी महिंद्रकर यांनी पेटीएम ॲपवरून कस्टमर केअरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. संपर्क न झाल्याने काही वेळातच एका अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सॲप व्हिडिओ कॉल आला. कॉल करणाऱ्याने स्वतःची ओळख पेटीएमचा कस्टमर केअर म्हणून करून दिली आणि थकलेले ३०० रुपये परत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. विश्वास बसवून आरोपीने व्यापाऱ्याला मोबाईलवरील काही प्रक्रिया करण्यास सांगितले. त्या सूचनांचे पालन करताच काही क्षणांतच महिंद्रकर यांच्या बँक खात्यातून ९३,२६० रुपये कट झाल्याचा मेसेज मोबाईलवर आला. रक्कम वजा झाल्याची माहिती दिल्यानंतर आरोपीने ही तांत्रिक प्रक्रिया असल्याचे सांगून पैसे परत येतील, असा दिलासा दिला.

संशय आल्याने महिंद्रकर यांनी त्वरित कॉल कट केला. त्यांनी लगेच बँकेत जाऊन खाते ब्लॉक केले आणि सायबर गुन्हे हेल्पलाईन क्रमांक १९३० वर तक्रार नोंदवली. त्यानंतर स्थानिक पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com